www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



जिल्ह्यातील मतदारांच्या संख्येत वाढ, २० दिवसात ७३ हजार मतदारांची भर

पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



विधानसभा मतदानासाठी सुट्टी बंधनकारक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई!

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १६० ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार,७ नोव्हेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महायुतीच्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना दिला कानमंत्र !



● ठाणे, यश सावंत :

ठाणे जिल्ह्यातील काही विधानसभा मतदार संघामध्ये महायुतीत झालेल्या बंडखोरीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'आपलं ठरलयं' असे सांगत महायुतीचे उमेदवार निवडुन आणण्याचे आवाहन बुधवारी महायुतीच्या मेळाव्यात पदाधिकाऱ्यांना केले. कोणीही काही म्हणत असले तरी आपण महायुतीच्या उमेदवाराचेच काम करा आणि निवडून आल्यावर कार्यकर्त्यांना जपा, असा कानमंत्रही त्यांनी दिला.

ठाणे येथील टिपटॉप प्लाझा महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा मेळावा बुधवारी आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. मला काही लोक येऊन विचारतात की, आपला कोणाला पाठिंबा आहे. त्यामुळे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना सांगू इच्छितो की, कोणीही संभ्रमावस्थेत राहू नका. आपल्या उमेदवारांची निशाणी कमळ, धनुष्य आणि घड्याळ आहे. चौथी आपली कोणतीही निशाणी नाही. यामुळे महायुतीच्या उमेदवारांना निवडुण आणाण्याचे काम करा, असा कानमंत्र मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिला. 'आपलं ठरलयं, महायुतीचे वारे फिरलयं आणि महायुती जिंकणार ही काळ्या दगडावरची भगवी रेघ आहे, असेही ते म्हणाले. कार्यकर्त्यांनी मतदारांपर्यंत पोहचून त्यांना आपल्या कामाबद्दल माहिती द्यावी. तसेच नागरिकांना सांगा की, मुख्यमंत्र्यांनी तुमच्याकडे पाठविले आहे. तुम्ही आमच्यासाठी दहा मिनिटे देऊन मतदान करा आणि पाच वर्षे सेवा मिळवा, असा विश्वास माझ्यावतीने नागरिकांना द्या, असा सल्लाही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला. खासदार आणि आमदार हे प्रत्येक घरापर्यंत पोहचू शकत नाहीत. महायुतीचा कार्यकर्ताच उमेदवाराचे ब्रँडींग करतो आणि मतदारांना मतदान केंद्रापर्यंत नेऊन आपल्या पक्षाला मतदान करायला लावतो.

पान २ वर

## नवी मुंबईतील 'तो' भूखंड क्रीडा संकुलासाठीच वापरा, सर्वोच्च न्यायालयाचे आदेश

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :

नवी मुंबईतील घणसोली येथे क्रीडा संकुलासाठी असलेली जमीन खासगी बांधकाम व्यावसायिकांना देण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाविरुद्ध मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाला आव्हान देणारी सिडकोची याचिका सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी फेटाळली. सिडको ही महाराष्ट्र सरकारच्या अख्यत्यारीतील संस्था आहे. नवी मुंबईसारख्या शहरी भागात हिरवा पट्टा जपण्यास सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला, न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने महत्त्व दिले आहे. मुंबईसारख्या शहरांमध्ये मुलांना खेळण्यासाठी उद्यानांची, मैदानांची गरज आहे अशी टिप्पणी चंद्रचूड यांनी केली. ते म्हणाले की, जी हरित क्षेत्र शिल्लक आहेत ती आपण नीट राखली पाहिजेत. मॉल्स आणि निवासी संकुले बांधण्यासाठी बिल्डरना हरित क्षेत्र देण्यात आले होते. नवी मुंबईतील मुलांना शाळांमधून परतल्यानंतर खेळण्यासाठी शेजारच्या रायगड जिल्ह्यात अनेक किलोमीटर प्रवास करून जाण्याची वेळ येऊ नये याकडे लक्ष दिले पाहिजे, असेही चंद्रचूड म्हणाले. नवी मुंबईतील क्रीडा संकुलासाठी



राखीव असलेला हा प्रकल्प या ठिकाणापासून ११५ किलोमीटर अंतरावर असलेल्या रायगड जिल्ह्यातील माणगाव येथे स्थलांतरित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता. मुंबई, नवी मुंबईमध्ये जी काही हरित क्षेत्र उरलेली आहेत, त्यांचे संरक्षण केले पाहिजे, असे याआधी सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते. नवी मुंबईतील जागा क्रीडा संकुलासाठी राखीव असल्याचे निश्चित करण्यात आले होते. मात्र, त्या जागेचा काही भाग निवासी व व्यावसायिक कारणासाठी खासगी विकासकाला दिला होता. त्याला सर्वोच्च न्यायालयाने विरोध केला.

## दिवाळीत पिंपरीमध्ये कचऱ्याचे ढीग

### दररोज सरासरी दोनशे टन कचऱ्याची भर

● पिंपरी, अभिजित येरल्लू :

दिवाळीनिमित्त बाजारात खरेदीसाठी झालेली गर्दी, फुले आणि फटाक्यांच्या आतषबाजीमुळे मुख्य बाजारपेठा आणि शहराच्या प्रत्येक भागात मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण झाला होता. महापालिकेने मुख्य बाजारपेठांबरोबरच शहरातील प्रत्येक भागातील कचरा उचलला आहे. त्यामध्ये दिवाळीचे चारही दिवस सरासरी १४०० टन कचरा महापालिकेकडून उचलण्यात आला. दोनशे टनांनी कच-यात भर पडली आहे. पिंपरी-चिंचवड शहरातील घरोघरचा कचरा घटांगाडीमार्फत संकलित केला जातो. मोशीतील कचरा डेपो येथे हा कचरा टाकला जातो. दिवसाला १२०० टन कचरा संकलित केला जातो. मात्र, दिवाळीत मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण झाला.



दिवाळीसाठी मागविलेल्या विविध वस्तूचे बॉक्स, पुट्टे, फटाक्याचा कचरा वाढला आहे. मुख्य बाजारपेठांमध्ये मोठ्या प्रमाणावर विक्रेते पूजेचे साहित्य व विविध साहित्याचे स्टॉल लावत असतात. दिवाळीचा पाडवा संपल्यानंतर स्टॉल हटविण्यात येतात. त्यानंतर संपूर्ण कचरा रस्त्यावरच पडतो.

पान २ वर

## मुंबईत तोतया डॉक्टरकडून शस्त्रक्रियेच्या नावाखाली वयोवृद्ध महिलेची लाखोंची फसवणूक

● मुंबई, राकेश गायकवाड :

एका तोतया डॉक्टरने गुडघ्यांवर शस्त्रक्रिया करून दिल्याचा बनाव रचत वृध्द महिलेकडून लाखो रुपये उकळल्याची घटना अंधेरीत उघडकीस आली आहे. या तोतया डॉक्टरसह त्याच्या साथीदाराविरोधात या प्रकरणी ओशिवरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी महिलेकडून सव्वा सात लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे.

ओळखपाळख नसलेल्या व्यक्तीकडून मिळालेल्या संपर्क



क्रमांकावरून डॉक्टरशी संवाद साधत उपचार करून घेण्याचा प्रकार अंधेरीतील ६१ वर्षीय महिलेच्या अंगलट आला. डॉ. झफर मर्चंट हा तोतया डॉक्टर आणि त्याचा सहकारी विनोद गोयल यांनी मिळून २०२१च्या नोव्हेंबरमध्ये या महिलेची आणि तिच्या कुटुंबाची फसवणूक केली होती. मात्र तीन वर्षांनंतर मंगळवारी या प्रकरणी तक्रारदार महिलेने पोलिसांकडे तक्रार केल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

२०२१ मध्ये तक्रारदार महिला त्यांच्या आईला घेऊन दंत चिकित्सेसाठी गेल्या असताना तिथे त्यांची ओळख आरोपी विनोद गोयलबरोबर झाली. त्यावेळी गोयलशी बोलताना महिलेने आईला गुडघ्यामध्येही प्रचंड वेदना होत असल्याचे सांगितले. त्यावेळी आरोपीने एका डॉक्टरचा संपर्क क्रमांक दिला आणि उपचार घेण्याचा सल्ला दिला, असे पोलिसांच्या तक्रारीत नमूद करण्यात आहे. त्यानंतर तक्रारदार महिलेच्या आईने दिलेल्या क्रमांकावर संपर्क केला असता संबंधित व्यक्तीने आपली ओळख डॉ. झफर मर्चंट अशी करून दिली. त्याने तक्रारदार महिलेचा घराचा पत्ता घेतला आणि तिथे जाऊन गुडघ्याची साधी शस्त्रक्रिया केली. त्याने दोन्ही गुडघ्यांवर कापून त्यातून रक्त काढले. ते रक्त एका कागदावर पसरवले. त्यावर हळद लावली आणि नंतर कागद फेकून दिला.

पान २ वर



## मुंबईतील घातपाताचा कट पोलिसांनी उधळला, गुन्हे शाखेकडून ९ पिस्तुलांसह ८ जणांना अटक

● वसई, सतीश सोनावणे :

ऐन निवडणुकीच्या तोंडावर मुंबईत घातपात घडविण्यासाठी रचण्यात आलेला कट मिरा भाईंदर वसई विरार पोलिसांच्या गुन्हे शाखा २ च्या पथकाने उधळून लावला आहे. पोलिसांनी याप्रकरणी ९ देसी पिस्तुल, २१ जिवंत काडतुसे असा शस्त्रसाठा जप्त केला असून केली आहे.सध्या राज्यात विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या असून प्रचाराला सुरवात झाली आहे. या काळात कायदा आणि सुव्यवस्था राखणे तसेच संभाव्य घातपाताच्या घटना रोखण्यासाठी पोलीस अधिक दक्ष असतात.

पान २ वर

## महाड एस.टी. आगारातील खासगी बसचालक रजेवर गेल्याने प्रवाशांची गैरसोय

● रायगड, विशाल पाटील :

एस.टी. महामंडळाने प्रत्येक आगारात बसेसचा तुटवडा असल्याने खासगी तत्वावर एसटी बसेस प्रत्येक आगारात आणल्या असून या बसचे चालक ऐन दिवाळीच्या सिझनला रजेवर गेल्याने प्रवाशांची प्रचंड गैरसोय व एसटी महामंडळाचे मोठे नुकसान होत आहे. याचबरोबर अचानक चालकाअभावी बस रद्द कराव्या लागत असल्याने प्रवाशांच्या रोषाला स्थानकात कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना सामोरे जावे लागत आहे. हा प्रकार



राज्यातील सर्वच स्थानकांमधून पाहायला मिळत आहे.

दिवाळीच्या सणाला शाळा-कॉलेज व कार्यालयांना सुट्टी असल्याने एसटीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या संख्येत आणि एसटीच्या उत्पन्नातही वाढ होत असते. सर्वच आगारात एसटी बसेसची कमी असणारी संख्या आणि त्यामुळे होणारी प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी एसटी महामंडळाने भाडे तत्वावर खासगी बसेस प्रत्येक आगाराला दिल्या आहेत.

महाड एसटी स्थानकात अशा १७खासगी बसेस असून हा ठेका साई गणेश या ठेकेदाराला देण्यात आला आहे. या ठेकेदाराकडून या बसेस करीता १७ चालक नेमण्यात आले आहेत. या खासगी बसेसचा चालक रजेवर राहिल्याने एखादी फेरी रद्द करावी लागली तर त्या ठेकेदाराकडून ५ हजाराचा दंड वसुल केला जातो. महाड एसटी स्थानकात असणाऱ्या या १७ खासगी बसेसचे १७ चालक ऐन दिवाळीच्या गर्दीच्या मोसमात रजेवर गेल्याने स्थानकातून दररोज नियमित सुटणाऱ्या लांब पल्ल्यांच्या गाड्यांचे वेळापत्रक कोलमडले आहे.

पान २ वर

## मनोज जरांगेंचे निवडणूक न लढविण्याचे कारण चुकीचे : राजरत्न आंबेडकर



● बदलापूर, विवेक गुंजाळ :

उमेदवारांची यादी दिली नाही, म्हणून आम्ही निवडणूक लढू शकत नाही, हे मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे - पाटील यांचे कारण चुकीचे आहे, असे राजरत्न आंबेडकर यांनी स्पष्ट केले. दलित आणि मुस्लिम संघटनांनी आधीच आपली यादी जरांगे- पाटील यांच्याकडे दिली होती, असेही आंबेडकर यांनी सांगितले. आंबेडकर यांनी बदलापुरात पत्रकारांशी संवाद साधला. ते पुढे म्हणाले की, निवडणूक लढायची नाही, या जरांगे पाटील यांच्या निर्णयाचे आम्ही आदर करतो. मात्र, मराठा आणि मुस्लिम संघटनांनी यादी दिली नाही, म्हणून निवडणूक लढू शकलो नाही, हे जरांगे पाटील यांनी दिलेल्या कारणामुळे समाजामध्ये गैरसमज पसरू शकतो. परंतु, आम्ही दलित आणि मुस्लिम समाजाच्या उमेदवारांची यादी जरांगे पाटील यांच्याकडे दिली होती. यापुढेही जे उमेदवार निवडणुकीत उभे आहेत, त्यांचा प्रचार करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच आम्ही मराठा समाजाच्या पाठीशी कायम उभे राहणार असल्याचेही आंबेडकर यांनी सांगितले. अनेक उमेदवार आपल्या जमिनी विकून नोकऱ्या सोडून निवडणुकीला उभे आहेत, अशा उमेदवारांना आम्ही बळ देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## निवडणूक आयोगाची ११ वाजताची डेडलाईन नियमानुसारच; हायकोर्टाने याचिका फेटाळली

● मुंबई, विशाल कारंडे :

निवडणूक आयोगाने अर्ज दाखल करण्याची ११ वाजताची डेडलाईन नियमानुसारच निश्चित केली होती. तशी नोटिस देखील प्रसिद्ध केली होती. अशी भूमीका घेत निवडणूक आयोगाने उच्च न्यायालयात डेडलाईनचे समर्थन केले. ११ वाजण्याच्या डेडलाईनवर उच्च न्यायालयाने फटकारल्यानंतर निवडणूक आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करताना याचिकेलाच जोरदार आक्षेप घेतला. याची दखल घेत न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर आणि न्यायमूर्ती सोमशेखर सुंदरसेन यांच्या खंडपीठाने याचिकाच फेटाळून लावली.





वांद्रे विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्यास इच्छुक वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार आकिफ अहमद दफेदार यांचा अर्ज सकाळी ११ वाजल्यानंतर दाखल केल्याचे कारण देत निवडणूक अधिकाऱ्यांनी बाद केला होता. या निर्णयाला आक्षेप घेत आकिफ दफेदार यांनी उच्च न्यायालयात धाव घेत याचिका दाखल केली. आयोगाच्यावतीने ॲड. अक्षय शिंदे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केले. ३० ऑक्टोबरपर्यंत सकाळी ११ वाजताची डेडलाईन ठेवण्याबाबत सूचना देण्यात आली होती तसेच याबाबतची नोटीस यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आली होती. याकडे न्यायालयाचे लक्ष वेधताना याचिकाकर्त्यांच्या अर्जात त्रुटी होत्या, क्रिमिनिल रेकॉर्ड आणि मालमत्ते विषयी तपशिल सादर केला नव्हता, या बाबी निवडणूक आयोगाने निदर्शनास आणून देत याचिका फेटाळण्याची विनंती केली. याची दखल घेत खंडपीठाने याचिका फेटाळून लावली.

## 'नो वॉटर- नो वोट'! अंबरनाथमध्ये पाण्याच्या समस्येविरोधात नागरिक आक्रमक

● अंबरनाथ, प्रथमेश चव्हाण :

अंबरनाथ शहरात असलेल्या पाणी समस्येला वैतागून नागरिकांनी आता 'नो वॉटर, नो वोट' असा नारा दिला आहे. अंबरनाथमध्ये पाण्याची समस्या कायम जाणवत असून पाण्याची हि समस्या मार्गी न लागल्यास मतदानावर बहिष्कार घालण्याचा इशारा नागरिकांनी मोहिमेतून देण्यात आला आहे.

विधानसभा निवडणुकीची धामधूम सुरु आहे. प्रत्येक पक्ष व उमेदवार निवडून येण्यासाठी प्रयत्न करत आहे. मतदारांच्या भेटी घेत कामांची पूर्तता करण्याबाबत आश्वासन देत



आहेत. मात्र अंबरनाथमध्ये नागरिकांना पाण्याची समस्या कायम भेडसावत असून यावर तोडगा काढण्यात आलेला नाही.

यामुळे येथी नागरिकांनी विधानसभा निवडणुकीची संधी साधत नो वॉटर नो वोट अशी मोहीम हाती घेतली आहे. अंबरनाथ पश्चिम भागात पटेल प्रयोशा गृहसंकुल असून तिथे १२ इमारतींमध्ये १५०० कुटुंबं वास्तव्याला आहेत. या संकुलात मागील ८ वर्षांपासून पाण्याची समस्या आहे.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# सुज्ञ की सैतान?

साऱ्या विवेकी जगाच्या हृदयाची धाकधूक वाढवणारी घटना या आठवड्यात घडेल. ती म्हणजे अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक. या जागतिक धाकधुकीचे भवितव्य तेथील जनतेने रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प वा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांच्यापैकी कोणास कौल दिला या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून असेल. म्हणजे ही धाकधूक थांबणार की पुढील चार वर्षांसाठी उत्तरोत्तर वाढणार हे या निवडणुकीत स्पष्ट होईल. त्या देशाच्या रीतीप्रमाणे पहिल्या नोव्हेंबरातील पहिल्या सोमवारनंतरच्या मंगळवारी ५ नोव्हेंबरला या निवडणुकीत अमेरिकेचा अध्यक्ष निवडला जाणार असला तरी तांत्रिक अर्थाने ही अध्यक्षीय निवडणूक म्हणता येत नाही. कारण विविध राज्यांत विखुरलेली अमेरिकी जनता प्रत्यक्षात राजकीय पक्षास मत देत असते. म्हणजे डेमॉक्रॅटिक वा रिपब्लिकन या पक्षांस मते दिली जातात आणि त्यातून ५३८ लोकप्रतिनिधी निवडले जातात. त्यातील किमान २७० लोकप्रतिनिधी ज्या पक्षाचे निवडून येतात त्या पक्षाचे लोकप्रतिनिधी राज्याराज्यांच्या राजधानीत डिसेंबरातील दुसऱ्या बुधवारनंतरच्या मंगळवारी एकत्र येतात आणि त्या बैठकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडले जातात. म्हणजे ही थेट अध्यक्षीय निवडणूक नाही. यातही परत मेख अशी की एखाद्या पक्षाचे एखाद्या राज्यात निम्म्यापेक्षा अधिक लोकप्रतिनिधी निवडून आले तर त्या राज्याची शंभर टक्के मते त्या त्या पक्षाच्या पारड्यात घातली जातात. अमेरिकेत एखादे राज्य 'लाल' की 'निळे' असे म्हटले जाते ते यामुळे. लाल रंग हा रिपब्लिकनांचा तर निळा डेमॉक्रॅट्सचा. या निश्चित रंगलेल्या राज्यांखेरीज खरी लढाई असते ती 'लाल' की 'निळे' हे ठरवता येत नाही, अशा राज्यांत. त्यांना स्विंग स्टेट्स म्हणतात. म्हणजे ही राज्ये रिपब्लिकनांची तळी उचलणार की डेमॉक्रॅट्सना पाठिंबा देणार यावर बऱ्याचदा अध्यक्षपदी कोण विजयी होईल, हे ठरते. अमेरिकेच्या निवडणूक प्रक्रियेविषयीची ही किमान आवश्यक तांत्रिक माहिती. आता तेथे सध्या सुरू असलेल्या अध्यक्षीय निवड प्रक्रियेतील राजकारणाविषयी. आपल्याकडची परिस्थिती बरीच बरी असे वाटावे असे सध्याचे अमेरिकेतील राजकारण. ते पाहिल्यावर हीच का ती जगातील महासत्ता असा प्रश्न पडावा आणि इतक्या बिनडोक मुद्द्यांवर तेथे राजकारण होत असेल तर या विश्वाचीच काळजी वाटावी. गेले काही महिने त्या देशातील प्रचार पाहिल्यास हा देश म्हणजे भौतिकदृष्ट्या अत्यंत प्रगत आणि बौद्धिक/मानसिकदृष्ट्या आदिम जनांचा समूह वाटू लागतो. यंदा अमेरिकेत कोणता मुद्दा सर्वाधिक 'चालला' असेल तर तो आहे 'सैतान' (सेटन). तो 'यशस्वीपणे' चालवण्याचे श्रेय(?) अर्थातच ट्रम्पबाबांचे. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस या निपुत्रिक आहेत, या पक्षाचे समर्थक हे मुख्यत: स्थलांतरित आहेत, त्यांचे अमेरिकेवर प्रेम नाही, ही सारी 'सैतान' समर्थकांची अवलाद, त्यांना रोखण्याची हिंमत एकच एक ट्रम्प यांच्यात आहे हे या कथानकातील लक्षणीय मुद्दे. ते अर्थातच रिपब्लिकनांनी रंगवले आणि त्यांच्या वतीने विविध लहानमोठ्या धर्मगुरूंनी प्रचारसभांतून जनमनात रुजवले. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे समर्थक तसेही धर्मभोळे, अंधश्रद्धांनी ओतप्रोत भरलेले, आधुनिकतेपासून मैलोगणती दूर, म्हणूनच स्त्रियांचा गर्भपाताचा हक्क नाकारणारे इत्यादी अवगुणवैशिष्ट्यांनी भरलेले असतात. त्यांच्या हलक्या मेंदूत ही सैतान-कथा खरोखरच रुजली. त्याचमुळे हे स्थलांतरित अमेरिकी नागरिकांचे पाळीव कुत्रे मारून खाऊ लागले आहेत ही ट्रम्पकढी देशभर चर्चेचा विषय ठरली. वास्तविक जेथे असे प्रकार घडल्याचे ट्रम्प यांनी बेधडकपणे सांगितले तेथील स्थानिक पोलिसांपासून प्रशासनापर्यंत अनेकांनी हे असे काही घडल्याचा अधिकृतपणे इन्कार केला. पण तरी ट्रम्प यांनी काही आपला हेका सोडला नाही. या ट्रम्पकथांस खऱ्या अर्थाने सर्वदूर पोहोचवण्याचे ऐतिहासिक कार्य केले ते पूर्वाश्रमीचे ट्विटर आणि आताच्या 'एक्स'चा मालक एलॉन मस्क यांनी. ट्रम्प आणि मस्क ही जोडगोळी म्हणजे जणू बिल्ला आणि रंगा. बिनबुडाच्या बिनडोक्यांस जेव्हा तंत्रज्ञान साथ देते तेव्हा काय होते याची अमेरिकेतील ही सध्याची जोडगोळी हे सर्वोत्कृष्ट उदाहरण. ट्रम्प यांच्या निर्बुद्ध दंतकथा समाजमाध्यम सरदार मस्क यांनी इमानेइतबारे सर्वत्र पसरवल्या. इतकेच नाही तर ट्रम्प यांस त्यांनी अधिकृतपणे पाठिंबाही जाहीर केला आणि हॅरिस यांची शक्य तितकी बदनामीही केली. प्रेम, आदर, सद्भावना आदी सत्त्वगुणांपेक्षा घृणा, अनादर आणि वैरभाव पसरवणे अधिक सहजसोपे असते. म्हणूनच गांधी एक असतो आणि त्यांस मारू पाहणारी डोकी अनेक. अमेरिकेत सध्याच्या निवडणुकीत त्याचा प्रत्यय येत असून ट्रम्प यांनी अत्यंत हिरिरीने लावलेल्या द्वेषवृक्षास मोठ्या जोमाने पाने/ फुले/ फळे लागताना दिसतात.

## आजची चित्रोळी



कणसांमधले दुधाळ दाणें
विरघळताती चोचीत !
हंगामातील हीच पर्वणी
लुटत असतो खुषीत !!

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# कर्करोगाचं निदान करा, हयगय नको !!



**प्रवीण वागडे**

जागतिक कर्करोग दिन हा ४ फेब्रुवारी रोजी कर्करोगाविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी आणि त्याचे प्रतिबंध, शोध आणि उपचारांना प्रोत्साहन देण्यासाठी म्हणून ओळखला जाणारा आंतरराष्ट्रीय दिवस आहे. हा दिवस संयुक्त राष्ट्रसंघाद्वारे पाळला जातो. तसेच जागतिक समुदायाला शिक्षण सुधारण्यासाठी आणि कर्करोगाविरूद्धच्या लढ्यात वैयक्तिक, सामूहिक आणि सरकारी कृती प्रज्वलित करतो. जागतिक कर्करोग दिन २००८ मध्ये लिहिलेल्या जागतिक कर्करोग घोषणेच्या उद्दिष्टांना पाठिंबा देण्यासाठी युनियन फॉर इंटरनॅशनल कॅन्सर कंट्रोलच्या मार्गदर्शनाने साजरा केला जातो. जागतिक कर्करोग दिनाचे प्राथमिक उद्दिष्ट कर्करोगामुळे होणारे आजार आणि मृत्यू लक्षणीयरीत्या कमी करणे हे आहे. तसेच कर्करोगापासून बचाव करता येण्याजोग्या पीडितांवर होणारा अन्याय दूर करण्यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायाला एकत्र आणण्याची ही एक संकल्पना आहे असे मानले जाते.

जागतिक कर्करोग दिन चुकीच्या माहिती विरोधात जनजागृती करतो, जागरूकता वाढवतो आणि हानी कमी करतो. जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोगाने बाधित झालेल्यांना पाठिंबा देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. यापैकीची एक चळवळ म्हणजे #NoHairSelfie असून, यात लोकांनी स्वतःचे डोके मुंडन करून किंवा तशी आभासी प्रतिमा निर्माण करून ती सोशल मीडियावर प्रगट करण्याची जागतिक चळवळ आहे. याद्वारे कर्करोगावर उपचार घेत असलेल्यांसाठी एक प्रकारे मानसिक पाठिंबा दर्शविण्याची ही एक कृती आहे. अशा प्रकारचे जगभरात शेकडो कार्यक्रम घेतले जातात. जागतिक कर्करोग दिनाची स्थापना ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिस येथे झालेल्या न्यू मिलेनियमसाठी कर्करोग विरुद्धच्या जागतिक कर्करोग शिखर परिषदेत करण्यात आली. जागतिक कर्करोग दिनाचा परिचय हा पॅरिस चार्टरचा एक महत्त्वाचा घटक आहे, जो कर्करोग संशोधन, प्रतिबंध, रूग्णांची काळजी, जागरूकता आणि जगभरात एकत्रीकरणाचाही प्रयत्न करतो. संशोधनाला चालना देण्यासाठी, कर्करोग रोखण्यासाठी, रुग्ण सेवा सुधारण्यासाठी पॅरिस अगेन्स्ट कॅन्सरची सनद तयार करण्यात आली होती. त्यामध्ये जागतिक कर्करोग दिन म्हणून स्थापित करणारा लेख देखील समाविष्ट होता, ज्यावर तत्कालीन युनेस्कोचे संचालक, कोचिरो मत्सुरा आणि तत्कालीन फ्रान्सचे अध्यक्ष जॅक शिराक ४ फेब्रुवारी २००० रोजी पॅरिसमध्ये या समिटमध्ये स्वाक्षरी केली होती.

सोप्या भाषेत सांगायचे तर, कर्करोग हा जगातील प्रमुख मारकांपैकी एक आहे. केवळ या वर्षी, जवळजवळ 9.6 दशलक्ष लोक कर्करोगाने मरतील आणि त्यावर नियंत्रण न ठेवता, 2030 पर्यंत दरवर्षी मृत्यूची संख्या 13.2 दशलक्षपर्यंत वाढेल. प्रतिबंध, शोध आणि उपचार कार्यक्रमांसाठी वाढीव सरकारी मदत आणि निधीमुळे यापैकी बरेच मृत्यू टाळले जाऊ शकतात. कर्करोगाविषयी जागरुकता वाढवण्यासाठी आणि या आजाराला तोंड देण्यासाठी व्यावहारिक धोरणे विकसित करण्यासाठी तातडीने पावले उचलली नाहीत तर लाखो लोक मरत राहतील. दुर्दैवाने, कॅन्सरमध्ये सर्वात जास्त वाढ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होण्याचा अंदाज आहे, जे रोगाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रभावाचा सामना करण्यास सर्वात कमी सज्ज आहेत. या आजाराबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि कर्करोगाचे ओझे कमी करण्यासाठी व्यावहारिक रणनीती विकसित करण्यासाठी तातडीने कृती करण्याची गरज आहे. जागतिक कर्करोग दिन हा शब्द पसरवण्याची आणि आंतरराष्ट्रीय मीडिया आणि जागतिक आरोग्य आणि विकास कार्यक्रमांमध्ये या रोगाबद्दल जागतिक जागरूकता निर्माण करण्याची योग्य संधी आहे.

"जागतिक कर्करोग दिन रन फॉर ए क्युअर आफ्रिकाची आठवण करून देतो की कर्करोग ही जागतिक आणीबाणी आहे आणि आपण प्रत्येकजण या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आपली भूमिका कशी बजावतो. रन फॉर ए क्युअर आफ्रिकाहा वकिलांच्या मोठ्या समुदायाचा एक भाग कसा आहे, याची साक्ष देणे, आमच्या कार्याला असेच देते. खूप अर्थ आणि आम्हाला कृती करण्यास प्रेरित करते." कर्करोग अशी स्थिती आहे ज्यामध्ये शरीरातील काही पेशी अनियंत्रितपणे विकसित होतात आणि शरीराच्या इतर भागांमध्ये पसरतात. जागतिक स्तरावर, कर्करोग हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे, 2020 मध्ये एक कोटीपेक्षा जास्त मृत्यूचे कारण आहे. भारतात, 2022 मध्ये अंदाजित 19 ते 20 लाख प्रकरणे आढळून आली आहेत. तंबाखूचा वापर, दीर्घकाळ मद्यपान, अस्वस्थ अन्न सवयी, शारीरिक व्यायामाचा अभाव आणि वायू प्रदूषणाच्या संपर्कात येणे हे सर्व कर्करोगाच्या धोक्याचे घटक आहेत. कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या राष्ट्रांना अनेक जुनाट आजारांमुळे होणाऱ्या कर्करोगाच्या जोखमीला तोंड देण्याचे अनोखे आव्हान आहे. या व्यतिरिक्त या राष्ट्रांनी शिक्षणाचा अभाव, विलंब निदान आणि स्वस्त उपचारांसाठी कमी प्रवेश यामुळे कर्करोगाचे खराब निदान दर्शविले होते. विकसनशील देशांमध्येही, कर्करोगाबाबत जागरूकता नसल्यामुळे निदानास विलंब होतो. 2020 मध्ये नोंदवलेला एक अभ्यास, भारतातील चार प्रमुख केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आला होता, जेथे कर्करोगाचे बहुसंख्य रुग्ण त्यांच्या प्रगत अवस्थेत असतानाच प्रथमच उपचार घेतात. साक्षरता दर आणि कमी उत्पन्नाचा कर्करोग जागरूकतेवर खूप प्रभाव पडतो. भारतात, उच्च उत्पन्न आणि साक्षरता पातळी असलेले लोक इतरांपेक्षा कर्करोगाविषयी अधिक जागरूक होते.

निष्कर्षापर्यंत, भारतीय आणि जागतिक लोकसंख्येमध्ये कर्करोगाची तपासणी, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल सामान्य जागरूकता कमी आहे, विशेषत: कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी आहे ज्यामुळे कर्करोगाचा प्रादुर्भाव वाढतो आणि ती भरून काढण्याची तातडीची गरज आहे. योग्य शिक्षणासह कमतरता. जागतिक कर्करोग दिन कर्करोग टाळण्यासाठी, तो लवकर शोधणे आणि उपचार करणे किती महत्त्वाचे आहे याकडे लक्ष वेधतो. कर्करोगाचे अनेक प्रकार टाळता येत नसले तरी, काही लोक निरोगी जीवनशैली जगत असले तरीही त्यांना कर्करोगाचे निदान केले जाईल. कर्करोगाचा धोका अनेक मार्गांनी कमी केला जाऊ शकतो. यासह फळे आणि भाज्या जास्त आणि प्रक्रिया केलेले पदार्थ आणि लाल मांस कमी असलेले पौष्टिक आहार घेणे, नियमित व्यायाम आणि निरोगी वजन राखणे, तंबाखूजन्य पदार्थांच्या वापरापासून दूर राहणे

किमान अल्कोहोल सेवन अतिनील किरणांपासून सावधगिरी बाळगण्यामध्ये सनस्क्रीन वापरणे आणि संरक्षणात्मक कपडे घालणे समाविष्ट आहे. तसेच शिफारस केलेल्या कर्करोगाच्या तपासणीमध्ये नियमितपणे सहभागी होणे, पर्यावरणातील हानिकारक रसायनांचा संपर्क टाळणे, ह्युमन पॅपिलोमाव्हायरस विरुद्ध लसीकरण ज्यामुळे कर्करोग होऊ शकतो. या वर्षी जागतिक कर्करोग दिनाची थीम आहे "केअर गॅप बंद करा," जी 2022 थीमची निरंतरता आहे आणि प्रत्येक वर्षासाठी निर्दिष्ट उद्दिष्टांसह 3 वर्षांची मोहीम चालेल. बहु-वर्षीय मोहिमेमध्ये अधिक एक्सपोजर आणि प्रतिबद्धता, तसेच जागतिक जागरूकता वाढवण्याच्या आणि प्रभाव पाडण्याच्या अधिक संधी मिळतील अशी अपेक्षा होती. एकत्रितपणे आम्ही सत्तेत असलेल्यांना आव्हान देतो. अंतिम वर्ष कर्करोगाच्या प्राधान्याबाबत उच्च अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणे, असमानतेचा सामना करण्यासाठी सर्जनशील धोरणे विकसित करणे आणि न्याय्य आणि कर्करोगमुक्त जग निर्माण करण्यासाठी संसाधनांचे वाटप करण्यावर भर देतो.

# ७ नोव्हेंबर : विद्यार्थी दिन !

७ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण राज्यात विद्यार्थी दिन साजरा केला जातो. याच दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर १९०० साली विश्वरत्न महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रतापसिंग हायस्कूल, राजवाडा चौक जिल्हा सातारा येथे शाळेत प्रवेश घेतला होता. त्यावेळी शाळेत भिवा म्हणून त्यांच्या नावाची नोंद करण्यात आली होती. या शाळेतील जनरल रजिस्टरमध्ये १९१४ या क्रमांकासमोर त्यांच्या नावाची नोंदणी व त्यासमोरील स्वाक्षरी ही ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून आजही शाळा प्रशासनाने जपून ठेवली आहे. या शाळेत ते १९०४ सालापर्यंत म्हणजे चौथी पर्यंत शिकले. ई स २००३ पासून पत्रकार अरुण जावळे हे हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा व्हावा यासाठी प्रयत्न करीत होते. २०१७ मध्ये बाबासाहेबांच्या शाळा प्रवेशाचे स्मरण म्हणून तसेच विद्यार्थ्यांना शिक्षण हेच उन्नतीचे एकमेव साधन असून त्याच्या परिश्रमाची जाण व्हावी यासाठी महाराष्ट्र सरकारने हा दिवस विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या दिवशी राज्यातील सर्व शाळा, महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित विविध पैलूंवर निबंध, वक्तृत्व, काव्य वाचन स्पर्धा आयोजित केल्या जातात. यावर्षी दिवाळीची सुट्टी असल्याने शाळा, महाविद्यालये बंद असली तरी या स्पर्धा ऑनलाइन आयोजित केल्या जाणार आहेत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा शाळा प्रवेश खऱ्या अर्थाने शैक्षणिक क्रांतीची आणि युगाची चाहूल म्हटली पाहिजे. कारण डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे पाऊल शाळेत पडल्यामुळे ते स्वतः सुशिक्षित आणि प्रज्ञावंत झाले आणि करोडो दलितांचे आणि वंचितांचे उध्दारकर्तेही झाले. विशेष म्हणजे ज्या संविधानाचा आज सर्वात आदर्श संविधान म्हणून देशभर गौरव होत असतो त्या भारतीय संविधानाचे ते शिल्पकारही ठरले. परिणामतः भारतीय समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मानवी मूल्ये रुजू शकली गेली म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा शाळा प्रवेश दिन ही अत्यंत महत्वाची आणि इतिहासाला कूस बदलायला लावणारी घटना आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे आजीवन विद्यार्थी होते त्यांनी आपला विद्याव्यासंग शेवटपर्यंत जपला. आजचा विद्यार्थी हा या देशाचे भविष्य आहे. त्यामुळे आदर्श विद्यार्थी निर्माण होणे ही काळाची गरज आहे. जर देशात आदर्श विद्यार्थी निर्माण झाले तर आपल्या देशाला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. या ऐतिहासिक दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन! तसेच सर्व विद्यार्थी मित्रांना विद्यार्थी दिनाच्या हार्दीक शुभेच्छा!



**-श्याम ठाणेदार, दौंड,पुणे.**

## पान १ वरून...

### 'नो वॉटर- नो वोट'! अंबरनाथमध्ये...

याबाबत मागण्या, निवेदनं, आंदोलनं, नगरपालिकेवर मोर्चा असं सगळं काही करूनही समस्या सुटलेली नाही. त्यामुळं आता 'नो वॉटर नो वोट' असा नारा या संकुलातील रहिवाशांनी दिला आहे. याचा सर्वच पक्षाच्या उमेदवारांना फटका बसू शकतो. त्यामुळं नेतेमंडळींनी फोडलेल्या नारळातच पाणी येतं? की आता नळालाही पाणी येतं? हे पाहावं लागेल.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महायुतीच्या...

त्यामुळे निवडुण आल्यावर आमदारांनी कार्यकर्त्यांना जपले पाहिजे. त्याच्या अडीअडचणी आणि प्रश्न सोडवावेत आणि त्यांच्या पाठिशी उभे रहावे, असे आदेशच त्यांनी उमेदवारांना दिले. कार्यकर्त्यांकडे लक्ष दिले नाहीतर तोही आपल्याला लक्ष देणार नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांकडे लक्ष द्या, असेही ते म्हणाले. ठाणे जिल्ह्यात यापुर्वी प्रचाराला अधिक वेळ देत होतो. परंतु आता राज्यात सभा घ्यायच्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यात अधिक वेळ देता येणार नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी महायुतीचा बालेकिल्ला साबूत ठेवण्यासाठी काम करावे, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राज्यातील मतदार संघामधील महायुतीचा प्रत्येक उमेदवार प्रचारासाठी येण्यास सांगत होता. या प्रचार सभांमुळे आपल्याला कोपरी पाचपाखाडीतून लढता येणार नसल्याचे शिंदे यांनी राहुल शेवाळे आणि संजय निरुपम यांना सांगितले होते. तुम्ही फक्त अर्ज भरा. आम्ही स्वत:ला एकनाथ शिंदे समजू आणि तुमचा प्रचार करु, अशी विनंती मी आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांना केली. त्यानंतर शिंदे यांनी उमेदवारी अर्ज भरल्याची माहिती खासदार नरेश म्हस्के यांनी मेळाव्यात बोलताना दिली.

### दिवाळीत पिंपरीमध्ये कचऱ्याचे ढीग

फुले, पूजा-साहित्याचा कचरा यामध्ये सर्वाधिक असतो.

यंदा दिवाळीच्या सुरूवातीपासूनच कचरा वाढत गेला. यामध्ये वसुबारसेच्या दिवशी १५६३, ३१ ऑक्टोबरला १३९७, लक्ष्मीपूजनादिवशी १३८२ तर पाडव्यादिवशी १३६८ टन कचऱ्याचे संकलन महापालिकेच्या आरोग्य विभागाने केले. दिवाळीच्या अगोदर तिन्ही दिवशी शहरातील कचऱ्याने उच्चांकी आकडा गाठला होता. याशिवाय नियमितचा कचरा उचलण्यात आला. नियमितच्या कचरा संकलनात यंदाच्या दिवाळीत दोनशे टन अतिरिक्त कचऱ्याची भर पडल्याची माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली. दिवाळीच्या प्रमुख तीन दिवसांत शहरात सरासरी १४०० टन एवढा कचरा जमा झाल्याचा अंदाज महापालिकेकडून वर्तविण्यात आला आहे. इतर दिवशी हा कचरा १२०० टन एवढा असतो.

दिवाळीनिमित्त नागरिक घरांची साफसफाई जास्त प्रमाणात करतात. त्यामुळे महापालिकेच्या कचरा संकलन करणाऱ्या गाड्यांमध्ये जास्त कचरा जमा होतो. दिवाळीनिमित्त बाजारपेठेतही जास्त कचरा साचतो. यंदा दिवसाला दोनशे टन कचऱ्याची भर पडल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांनी सांगितले.

### मुंबईत तोतया डॉक्टरकडून शस्त्रक्रियेच्या...

त्यानंतर शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे असे सांगत आईच्या गुडघ्याचा त्रासही दूर झाल्याचे सांगितले. शिवाय, उपचारासाठी सात लाख २० हजार रुपये शुल्क मागितले. तक्रारदार आणि तिच्या आईने सव्वा सात लाख रुपये रोख रक्कम म्हणून दिले.

शस्त्रक्रियेनंतरही आईला गुडघ्यात वेदना होऊ लागल्या, म्हणून त्यांनी डॉ. मर्चंटशी पुन्हा संपर्क साधला. मात्र, त्याचा फोन बंद होता. त्यांनी विनोद गोयलला दूरध्वनी केला, त्यानेही त्यावेळी खोटी आश्वासने दिली. नंतर मात्र दोन्ही आरोपींनी तक्रारदारांच्या कुटुंबियांचे दूरध्वनी उचलणे बंद केले. त्याच दरम्यान तक्रारदार महिलेची सासू व सासऱ्यांचे निधन झाल्यामुळे त्या तत्काळ तक्रार देऊ शकल्या नाही. त्यानंतर डॉ. मर्चंटने पश्चिम उपनगरातील इतर वृद्ध नागरिकांना देखील याच पद्धतीने फसवल्याचे वृत्त तक्रारदार महिलेने वाचले. अखेर दोन महिने प्रतीक्षा केल्यानंतर त्यांनी मंगळवारी पोलिसांकडे तक्रार दाखल केली. या प्रकरणी ओशिवरा पोलिसांनी डॉ. मर्चंटविरुद्ध भारतीय दंड संहिता ४१९ (तोतयागिरी) आणि ४२० (फसवणूक) कलमानुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपींनी अशा प्रकारे आणखी व्यक्तींची फसवणूक केली असल्याचा संशय आहे.

### मुंबईतील घातपाताचा कट पोलिसांनी...

मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा क्रमांक २ च्या पथकाला वसईच्या सुरूची बाग परिसरात असलेल्या दोन तरूणांकडे पिस्तुल असल्याची माहिती मिळाली होती. त्यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांच्याकडे एक पिस्तुल आणि जिवंत काडतुसे सापडली. यानंतर पुढील तपासात घातपात घडविण्याचा षडयंत्राचा पर्दाफाश झाला. गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे आणि त्यांच्या पथकाने गुजराथ आणि उत्तरप्रदेश येथे सापळा लावून तब्बल ८ जणांना अटक केली. त्यांच्याकडून ९ देशी पिस्टल आणि २१ जिवंत काडतुसे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही शस्त्रे उत्तरप्रदेशातून आणण्यात आली होती. मुंबई परिसरात ती विविध व्यक्तींना पोहोचविण्यात येणार होती. हे सर्व आरोपी गुन्हेगारी क्षेत्रातील असून वसई आणि मुंबई परिसरात शस्त्रे वितरित करण्याचे काम करतात. दिवसा ते गॅरेज मध्ये तसेच डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत होते, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) मिलिंद बल्लाळ यांनी दिली.पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा २ चे प्रमुख वरिष्ठ पोलीस निरीक्षक शाहूराज रणावरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास कांबळे, सागर शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अजित गिते, रमेश भोसले, संजय नवले, रवींद्र पवार, प्रफुल्ल पाटील, चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी आदींच्या पथकाने ही कामगिरी केली.

### महाड एस.टी. आगारातील खासगी...

बुधवारी सकाळी ८ वाजता सुटणारी पोलादपूर बोरिवली हि वरील चालक नसल्याने महाड बोरिवली व पोलादपूर बोरिवली अशा दोन गाड्यांतील प्रवाशांसाठी एकच बस सोडण्यात आल्याने आरक्षण केलेल्या प्रवाशांनी आपल्या बुकिंगची सीट मिळण्यासाठी गोंधळ घातला. या दोन्ही गाड्यातील प्रवाशांना त्यांच्या सीटवर अडजस्ट करताना वाहतुक नियंत्रक व वाहक यांना तारेवरची कसरत करावी लागली.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# श्री चैतन्य टेक्नो शाळेचा जागतिक विक्रम पूर्ण

**कल्याण (गणेश बागडे) :** उल्हासनगर येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूल मधील विद्यार्थ्यांनी जागतिक विक्रम नोंदवला आहे. श्री चैतन्य शैक्षणिक संस्थांच्या वतीने जागतिक विक्रम आयोजित केला होता. त्यांच्या मध्ये समर्पण, नाविन्यपूर्ण शिक्षण आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी एक ऐतिहासिक हॅट्रिक वर्ल्ड रेकॉर्ड केला. जिथे बहुतेक विद्यार्थी गणिताचे फॉर्मुला पाठ करतात, (किमान १०० आणि कमाल ६०० फॉर्म्युले) ३ ते १० वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी तयार केल्या गेल्या आहेत, यामध्ये २० राज्यांमधील १२० शाळा मधील १०,००० विद्यार्थी एकाच वेळी १००० झूम आयडीद्वारे यामध्ये सामील झाले होते.

या स्पर्धेत श्री चैतन्य टेक्नो स्कूल उल्हासनगर शाखा मुंबई झोनचे १५ विद्यार्थी सहभागी झाले होते. १५ स्पर्धकांपैकी ४ स्पर्धक अर्शन पगारे, हिरेन वालेचा, रिजुल नायर आणि अर्णवी थोरात यांनी ६०० फॉर्म्युले वाचून या सुपर हॅट्रिक वर्ल्डमध्ये आपले कौशल्य पणाला लावत जागतिक विक्रम प्रस्थापित केला. हा कार्यक्रम वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स यूके, मॉनिटरेड आणि रेकॉर्डेडच्या अधिकाऱ्यांनी थेट पाहिला आणि एकाच वेळी कामगिरीचे मूल्यांकन केले.

श्री चैतन्य टेक्नो स्कूल्सचा हा चौथा वर्ल्ड रेकॉर्ड इव्हेंट होता. यासाठी संचालक, सीमा भोप्पणा, सुषमा भोप्पणा, श्रीधर, नागेंद्र गारू आणि मुंबई झोनचे जनरल मॅनेजर सुरेंदर राजारिकम, विभागीय समन्वयक मेधा तांदळे, आर. आय. अभिषेक, मुख्याध्यापिका चंद्रकला मौर्य, शिक्षक आणि पालक यांनी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सर्व सहभागींना मनापासून शुभेच्छा दिल्या.

# भिवंडीत निवडणूक भरारी पथकाकडून दोन कोटीची रक्कम जप्त

**कल्याण (आकाश कांबळे) :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भिवंडी शहर परिसरात निवडणूक आयोगाची भरारी पथके आणि स्थिर सर्वेक्षण विभागाकडून संशयास्पद वाहनांची तपासणी केली जात आहे. अशाच वाहन तपासणीच्यावेळी भिवंडी पोलिसांना धामणकर नाका येथे मे. सीएमएस कंपनीचे रोख रक्कम घेऊन जाणारे वाहन आढळले. पोलिसांनी या वाहनाची तपासणी केली. त्यात दोन कोटी ३० लाख रूपये आढळले. या रक्मेबाबत वाहन चालकासह संबधित योग्य ते पुरावे आणि खात्रीलायक माहिती देऊ शकले नाहीत



त्यामुळे हे वाहन भरारी पथकाने रोख रक्मेसह ताब्यात घेतले.

ही माहिती साहाय्यक पोलीस आयुक्त सचिन सांगळे यांनी भरारी पथकाचे अधिकारी हेमंत पष्टे यांना दिली. निवडणूक अधिकारी धामणकर नाका येथे आले. त्यावेळी रोख रक्कम घेऊन जाणाऱ्या वाहनात दोन जवान, दोन रक्कम संरक्षक, एक चालक असे पाच जण होते. एटीएम यंत्रामध्ये भरणा करण्यास लागणाऱ्या आकारातील बंदिस्त साच्यामधील रक्कम, वाहनातील पिशव्यांमधील रकमेची मोजणी करण्यात आली. ही रक्कम दोन कोटी ३० लाख १७ हजार असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले.

ही माहिती निवडणूक अधिकाऱ्यांनी कल्याणचे प्राप्तिकर विभागाचे अन्वेषण कक्षाचे अधिकारी पवन कौशिक यांना दिली. ते घटनास्थळी आले. आचारसंहिता पथक प्रमुख सुधीर गुरव, खर्च निरीक्षक शरद यादव, कौशिक यांनी जप्त रकमेचा पंचनामा केला. ही रक्कम सिलबंद करून भिवंडी येथील कोषागार कार्यालयात जमा करण्यात आली. जप्त वाहनातील रोख रकमेचा प्राप्तिकर अधिकारी तपास करून अहवाल सादर करतील. त्यानंतर योग्य त्या कारवाईचा निर्णय घेतला जाईल. अमित सानप निवडणूक निर्णय अधिकारी भिवंडी पूर्व.



# पालघर जिल्ह्यात भात कापण्यांची लगबग

**खानिवडे (सतीश सोनावणे) :** दिवाळी आणि भाऊबीज सरताच पालघर जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांनी भात कापणीला पुन्हा सुरुवात केली आहे तशी लगबग जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात सुरू असल्याचे दिसून येत आहे. परतीच्या धमाकेदार पावसामुळे हळव्या पिकांची नासाडी झली तर निम गरवे पीक काहीतरी हाती लागण्यासारखे असून गरव्या पिकांची मात्र चांगली आणेवारी येईल अशा अपेक्षेने शेतकरी कापण्या करत आहे मात्र तश्या यंदा कापण्या लांबणीवर पडल्या आहेत.

पालघर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात भातशेती केली जाते. जिल्ह्याचे मुख्य पीक भात पीक असल्याने अनेक कुटुंबे या शेतीवरच उदरनिर्वाह करत आहेत. भातपिके कापल्यानंतर पुढे भाजीपाला, कडधान्य, फुले लागवडदेखील केली जाते. मात्र या परिसरात भात हे मुख्य पीक आहे, पण सध्या शेतात काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी झाल्याचा फटका शेती कामांवर होऊ लागला आहे. मजूर टंचाईमुळे मजुरीदेखील मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# जिल्ह्यातील मतदारांच्या संख्येत वाढ, २० दिवसांत ७३ हजार मतदारांची भर

**ठाणे (रोहित जैसवार) :** विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मागील २० दिवसांत जिल्ह्यात ७३ हजार ६११ मतदारांची नवीन नोंद झाली आहे. तर लोकसभा निवडणूकीपासून आतापर्यंत ४ लाख २८ हजार ९५ मतदारांची वाढ झाली आहे. लोकसभा निवडणुकीत लिंग गुणोत्तर ८४८ होते, ते आता ८८० पर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे महिला मतदारांची नोंदणी करण्यास प्रशासनाला यश आल्याचे दिसून येत आहे.



विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर ठाणे जिल्ह्यात प्रशासनाकडून मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आले होते. लोकसभा निवडणूकी दरम्यान प्रशासनाने राबविलेल्या मतदार नोंदणी कार्यक्रमांतर्गत ६८ लाख १ हजार २४४ इतकी होती. त्यानंतरही आयोगाच्या सूचनेनुसार विशेष संक्षिप्त आढावा कार्यक्रम जाहीर करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत मतदार नोंदणीत ३ लाख ५४ हजार ४८४ नवीन मतदारांनी वाढ झाली होती. जिल्हा प्रशासनाच्या वतीने १६ ऑक्टोबरला नव्याने मतदार यादीबाबतची माहिती प्रसिद्ध झाली होती. त्यामध्ये १८ विधानसभा मतदार संघात ७१ लाख ५५ हजार ७२८ मतदारांची नोंदणी झाल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. यामध्ये ३८ लाख १३ हजार २६४ पुरुष आणि ३३ लाख ४१ हजार ७० महिला तसेच १ हजार ३९४ इतर मतदारांचा समावेश आहे.

विधानसभा निवडणूकीचे मतदान २० नोव्हेंबरला होणार आहे. जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी मंगळवारी नवीन यादी प्रसिद्ध केली आहे. यामध्ये ७३ हजार ६११ नवीन मतदारांची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले. अवघ्या २० दिवसांत हे मतदार वाढले आहे. त्यामुळे मतदारांची संख्या ७२ लाख २९ हजार ३३९ इतकी झाली आहे. यामध्ये ३८ लाख ४५ हजार ४२ पुरूष आणि ३३ लाख ८२ हजार ८८२ महिला तसेच १ हजार ४१५ इतरांचा सामावेश आहे. १८ ते १९ वयोगटातील मतदारांची संख्या आता १ लाख ७२ हजार 1 लाख 72 हजार ९८१ इतकी झाली आहे. तर दिव्यांग मतदारांची संख्या ३८ हजार १४९ असून ८५ वर्षांवरील मतदारांची संख्या ५६ हजार ९७९ इतकी झाली आहे.

## ओवळा माजिवडा मतदारसंघात सर्वाधिक मतदार

जिल्ह्यातील सर्वाधिक मतदार हे ओवळा-माजिवडा मतदारसंघातील आहे. या क्षेत्रात ५ लाख ४५ हजार ११० मतदार आहेत. तर सर्वात कमी मतदार उल्हासनगर विधानसभा क्षेत्रात आहेत. येथे २ लाख ८३ हजार ३७९ मतदार आहेत. ठाणे जिल्ह्यात ६ हजार ९५५ मतदान केंद्र आहेत. यात ६ हजार ८९४ मूळ मतदान केंद्र असून ६१ साहाय्यकारी मतदान केंद्र आहेत.

# ठाण्यात ५४ शस्त्रधारकांचे परवाने रद्द, तर ३५३ परवानाधारक शस्त्रे जमा करणे बाकी

**ठाणे (रोहित जैसवार) :** विधानसभेची निवडणूक निर्भयपणे पार पडावी, यासाठी पोलीस प्रशासनाकडून ४,७३४ परवानाधारक शस्त्रे जमा करण्यात आली आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलिसांकडून ही कार्यवाही करण्यात आली असून उर्वरित परवाना शस्त्रे जमा करण्याची कार्यवाही सुरू असल्याची माहिती पोलिसांच्या वतीने देण्यात आली आहे. जिल्ह्यात एकूण ६ हजार ३९१ शस्त्र परवानाधारक आहेत. त्यापैकी, ४ हजार ७३४ शस्त्रास्त्रे जमा करण्यात आली आहेत. तर अद्यापही ३५३ शस्त्रे जप्त करणे बाकी असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी दिली. ३,९४४ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून अटकेचे वॉरंट बजावण्यात आले आहे. ठाणे जिल्ह्यात अतिसंवेदनशील मतदार केंद्र नसून निवडणुकीसाठी दहा हजार पोलिसांची आवश्यकता आहे. यावेळी सहपोलीसa आयुक्त दत्ता शिंदे, डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, पोलीस अधीक्षक डॉ. डी. स्वामी हे उपस्थित होते. ठाणे शहर आणि ग्रामीण



पोलीस क्षेत्रातील सर्व शस्त्र परवानाधारकांची शस्त्रे जप्त करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, बँका, महत्त्वाची कार्यालये, संस्था, विद्युत केंद्र, सराफी केंद्रे व इतर महत्त्वाच्या कार्यालयाचे शस्त्र वगळून सर्व परवानाधारक शस्त्रे जमा करण्याचे कडक आदेश संबंधित झोनच्या पोलीस उपायुक्तांना देण्यात आले असून शस्त्रे जमा करण्याची कारवाई सुरू आहे. ठाणे जिल्ह्यात एकूण ७ हजार ३९१ शस्त्र परवानाधारक आहेत. त्यापैकी, ४ हजार ७३४ शस्त्रास्त्रे जमा करण्यात आली आहेत. पोलीस अहवालातील वादग्रस्त असलेल्या ५४ शस्त्रधारकांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. तर अद्यापही ३५३ शस्त्रे जमा करणे बाकी असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# डोंबिवलीतील स्थलांतरीत कंपन्यांच्या जागी आयटी हब हवा

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) -** डोंबिवली एमआयडीसीच्या फेज १ आणि २ परिसरात जवळपास ७५० विविध उत्पादने घेणाऱ्या कंपन्या आहेत. यातील १५० रासायनिक, तर ११० कापड उद्योग आहेत. या कंपन्यांपैकी २३४ कंपन्या धोकादायक जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यांचे अन्य ठिकाणी स्थलांतर करावे, अशी शिफारस मध्यंतरी राज्य सरकारने स्थापन केलेल्या कृती समितीला केली होती. या कंपन्यांच्या जागी आयटी व तत्सम उद्योगांकरिता एमआयडीसीतील जागा उपलब्ध करून दिल्यास या भागातील लाखो तरूण आणि तरूणींना रोजगार उपलब्ध होणार आहे. आम्हीही



मतदार आहोत. आम्हालाही मतदान करायचे आहे. पण आमच्या या मागण्यांचा राजकिय पक्षांचे उमेदवार आणि नव्याने स्थापन होणाऱ्या सरकारकडून विचार व्हावा, अशी अपेक्षा युवकांनी व्यक्त केली आहे. एमआयडीसीतील फेज दोनमध्ये केमिकल कंपन्या आहेत. २३४ कंपन्या धोकादायक असल्याने त्या हलविण्याचा निर्णय झाल्यास सगळा केमिकल झोन रिकामा होईल. स्थलांतरास कंपनी मालकांचा विरोध आहे. कामा अर्थात कल्याण अंबरनाथ मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनने सरसकट सगळयाच कंपन्यांचे स्थलांतर करू नये, अशी मागणी केली आहे.

# बेलापूरमध्ये बंडोबांच्या शोधासाठी भाजप सक्रिय, वरिष्ठ पातळीवर हालचालींना वेग

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** बेलापूर विधानसभा मतदारसंघात जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्या बंडखोरीमुळे भाजपचे वरिष्ठ नेते कमालीचे सावध झाले असून नाईक यांच्या उमेदवारीमुळे नाराज असलेल्या महाविकास आघाडीतील नेत्यांना गळाला लावण्यासाठी पक्षाची वरिष्ठ पातळीवरील यंत्रणा कामाला लागल्याचे सांगितले जाते. काँग्रेसचे नवी मुंबईतील जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राजू शिंदे यांना पक्षात घेताना भाजपच्या ठाणे, डोंबिवलीतील नेत्यांना सक्रिय केले गेल्याचे सांगितले जाते. विशेष म्हणजे, ही मोहीम फत्ते करत असताना बेलापूरच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांनाही दूर ठेवले गेल्याचे वृत्त आहे. नवी मुंबईत गणेश नाईक कुटुंबीयांच्या ताकदीची भाजप नेत्यांना




पूर्णपणे जाणीव आहे. संदीप नाईक यांनी बेलापूरमधून बंडखोरी करत शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करताच भाजपच्या या भागातील २५ पेक्षा अधिक नगरसेवकांनीही त्यांच्यासोबत तुतारी हाती घेतली. २०१४ नंतर नवी मुंबईतील काही उपनगरांमध्ये भाजपचा प्रभाव वाढला आहे. वाशी सेक्टर १७ सारख्या गुजरातीबहुल भागात भाजपला मोठे मताधिक्य मिळते असा अनुभव आहे. या भागातील संपत शेवाळे, विजय वाळुंज यांसारखे माजी नगरसेवकदेखील संदीप नाईक यांच्याबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात गेले. बेलापूर मतदारसंघात आगरी समाजाचा एक मोठा मतगठ्ठा आहे. नेरुळ भागातील क्रिकेट मैदानाच्या जागेचे आरक्षण बदलण्यावरून झालेल्या वादाचा मोठा परिणाम या समाजातील एका मोठ्या घटकावर होऊ शकतो. त्यामुळे भाजपच्या उमेदवार मंदा म्हात्रे यांना ही निवडणूक आव्हानात्मक मानली जात आहे. हे लक्षात घेऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांनी बेलापूरमधील घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली असून या भागातील महाविकास आघाडीतील नाराजांना थेट गळाला लावण्याची रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे. ऐन दिवाळीच्या धामधूमीत काँग्रेसचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष अनिल कौशिक आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते राजू शिंदे यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईतील सागर बंगल्यावर या दोन पदाधिकाऱ्यांना बोलावून घेण्यात आले आणि तेथे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत या दोघांचा प्रवेश करण्यात आला. हा प्रवेश होत असताना नवी मुंबईतील भाजपच्या एकाही स्थानिक नेत्याला ‘सागर’ बंगल्यावर पाचारण करण्यात आले नव्हते. कौशिक आणि शिंदे यांच्या प्रवेशाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाममंत्री चव्हाण आणि ठाण्यातील विधान परिषदेचे आमदार निरंजन डावखरे यांच्यावर सोपविण्यात आली होती. या दोन नेत्यांना बंडापूर्वी दोन दिवस आधी कौशिक आणि शिंदे यांच्या भेटीसाठी थेट नवी मुंबईत पाठविण्यात आले होते.

# निवडणुकीनंतर विमानतळ नामकरण आंदोलन तीव्र, नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांची माहिती

**उरण (भावना जैन) :** नवी मुंबई विमानतळ नामकरण मागणीसाठी तीन वर्षे लढा सुरू आहे. मात्र त्याचा निर्णय होत नाही. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर केंद्र सरकारने तातडीने दिबांच्या नावाचे आश्वासन न दिल्यास तीव्र आंदोलन पुकारले जाईल, अशी माहिती सर्वपक्षीय नवी मुंबई विमानतळ नामकरण समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील यांनी दिली आहे. सर्वपक्षीय नामकरण समितीने दिल्लीत केंद्रीय नागरी विमान मंत्र्यांची नुकतीच भेट घेतली होती. यावेळी पुन्हा एकदा केंद्राने दिबांच्या नावाचे




आश्वासन दिले आहे. तसेच यासाठी एकमेव दिबांच्याच नावाचा प्रस्ताव असल्याचेही स्पष्ट केले आहे. तत्कालीन केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य संधिया यांनीही अशा प्रकारचे आश्वासन दिले होते. मात्र मार्च २०२५ पासून नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित होणार असून अजूनपर्यंत दिबांच्या नावाचा प्रस्ताव पंतप्रधान कार्यालयाकडे पाठविण्यात आला नसल्याने नामांतरणाचा निर्णय केव्हा होणार असा प्रश्न आता भूमिपुत्रांना पडला आहे. भूमिपुत्रांच्या संघर्षामुळे दिबांच्या नवी मुंबई विमानतळ नामकरण लढ्याची दखल घेत केंद्र सरकार नामकरणाची प्रक्रिया पूर्ण करणार आहे. लवकरच नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव जाहीर केले जाईल, अशी माहिती केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री कंजरापू राम मोहन नायडू यांनी सर्वपक्षीय शिष्टमंडळाला दिली होती. लोकनेते दि. बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने नामकरणाचा पाठपुरावा आणि सद्या:स्थिती जाणून घेण्यासाठी नवी दिल्ली येथे राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुढाकाराने केंद्रीय मंत्री नायडू यांची भेट घेतली होती. त्यांनी दिबांच्या खेरीज कोणाच्याही नावाचा प्रस्ताव आमच्या मंत्रालयाला आला नसल्याचे स्पष्ट केले. निवडणूक संपताच नामकरण समिती केंद्र सरकारने नवी मुंबई विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव देण्याच्या निश्चितीचे ठोस आश्वासन देण्याची मागणी करणार आहे. ती मान्य न झाल्यास पुन्हा एकदा तीव्र आंदोलन करणार आहोत.

# मध्य रेल्वेची झाली १५८३ दशलक्ष प्रवासी संख्या

**रोहे (धनश्री सट्टा) :** मुंबईची जीवनवाहिनी असलेली मध्य रेल्वे शतकपूर्तीच्या दिशेने वाटचाल करत असून जीआयपी रेल्वेचा उत्तराधिकारी असलेली मध्य रेल्वे आपल्या स्थापना दिनाची ७३ गौरवशाली वर्षे पूर्ण करत आहे. बुधवार, दि. ५ नोव्हेंबर रोजी मध्य रेल्वे ७४ व्या वर्षात पदार्पण करत आहे. आशियातील पहिली ट्रेन ही मुंबई ते ठाणे दरम्यान शनिवारी १६ एप्रिल १८५३ रोजी चालू झाली. १९०० मध्ये जीआयपी रेल्वे कंपनीमध्ये इंडियन मिडलँड रेल्वे कंपनीचे विलीनीकरण झाल्यानंतर, तिची सीमा उत्तरेला दिल्ली, ईशान्येला कानपूर आणि अलाहाबाद आणि पूर्वेला नागपूरपासून दक्षिण-पूर्वेला रायचूरपर्यंत वाढवण्यात आली. अशा प्रकारे, मुंबईपासून भारताच्या जवळजवळ सर्व भागांशी संपर्क साधला गेला. रेल्वे मार्ग मायलेज (मैल) १,६०० होती. (२५७५ किमी)



५ नोव्हेंबर १९५१ रोजी, निजाम राज्य, सिंधिया राज्य आणि ढोलपूर राज्य रेल्वेचे, ग्रेट इंडियन पेनिनसुलर रेल्वेसह एकत्रीकरण करून मध्य रेल्वेची स्थापना करण्यात आली. २२३ मध्ये, मध्य रेल्वेचे ८ विभाग असलेले ५ विभागांचे पुनर्गठन करून आणखी सात झोन तयार करण्यात आले, ज्यामध्ये मध्य रेल्वेच्या जबलपूर आणि भोपाळ विभागांचा पश्चिम मध्य रेल्वेमध्ये आणि झाशी विभागाचा समावेश उत्तर मध्य रेल्वेमध्ये करण्यात आला.

# लग्नाच्या १३ वर्षांनंतरही मुल का नाही? सतत एकच प्रश्न विचारणाऱ्यांना प्रिया बापटचं रोखठोक उत्तर



मराठी मालिका, चित्रपट आणि नाटकातून आपल्या अभिनयाची छाप पाडणारी लोकप्रिय अभिनेत्री प्रिया बापट सध्या हिंदी वेब सीरिज गाजवताना दिसतेय. प्रिया अनेक लोकप्रिय हिंदी सीरिजमध्ये दिसली. प्रिया आणि उमेश हे दोघेही प्रेक्षकांचे अत्यंत लाडके आहेत. दोघेही आपापली कामं सांभाळून एकमेकांसाठी वेळ देताना दिसतात. प्रिया आणि उमेश यांनी १३ वर्षांपूर्वी विवाह केला होता. मात्र अजून तरी त्यांनी मुलांचा विचार केलेला नाही. यावरून अनेकदा चाहते त्यांना प्रश्न विचारताना दिसतात. इतकी वर्ष झाली आता तरी मुलांचं मनावर घ्या असे सल्ले देताना दिसतात. आता असे प्रश्न विचारणाऱ्यांना आणि सल्ले देणाऱ्यांना प्रियाने आता उत्तर दिलं आहे.

प्रियाने नुकतीच अमुक तमुक या युट्यूब चॅनेलवा हजेरी लावली होती. या मुलाखतीत बोलतां ती म्हणाली, 'माझ्या लग्नाला १३ वर्ष झाली आहेत. नाही आहेत मला मुलं पण हे जे काही आहे तो निर्णय माझा आहे. उद्या जर मला वाटलं की ४२ व्या वर्षी मला मूल जन्माला घालायचंय तर मी घालेन जन्माला. हे तेव्हाही नाही वाटलं तर नाही घालणार. पण हे प्रश्न विचारणं थांबवलं पाहिजे. लोकांची ही अपेक्षा असते की, ह्या जोडप्याचं मूल बघायचंय. प्रत्येक जोडप्याची अपेक्षा ही मुल होणंच नाहीये ना. जोडप्याने मूल जन्माला घातलं पाहिजे हा अलिखित नियमच मला पटत नाहीये.

'प्रिया पुढे म्हणाली, पण लोक आम्हाला त्यांचे आदर्श मानतात. त्यांचं आमच्यावर प्रचंड प्रेम आहे. पूर्वी मला अशा प्रश्नांचा राग यायचा पण आता मात्र मला त्यांची मानसिकता समजायला लागलीय. ते आम्हाला आपलं मानतात म्हणून त्यांच्याकडून हे प्रश्न येतात. पण मुलं जन्माला घालायचं की नाही किंवा कधी घालायचं हा प्रश्न सर्वस्वी माझा आणि माझ्या नवऱ्याचा आहे. प्रिया नुकतीच 'रात जवान हैं' या वेबसिरीजमध्ये दिसली आहे.

## आदिश वैद्य आणि गायिका जाई देशमुखचं नवीन रोमँटिक गाणं प्रेक्षकांच्या भेटीस




बिग बॉस मराठी सीजन 3 फेम अभिनेता आदिश वैद्य वेगवेगळ्या प्रोजेक्टसमधून प्रेक्षकांच्या भेटीस येत असतो. मध्यंतरी अनेक हिंदी मालिकांमध्येही त्याने काम केलं होतं. नुकतंच त्याच नवीन रोमँटिक गाणं सोशल मीडियावर रिलीज करण्यात आलं आहे. 'कशी ओढ' असं या गाण्याचं नाव असून 'पॅनोरमा म्युझिक' चॅनेलवर हे गाणं प्रदर्शित करण्यात आलं आहे.

हे गाणं भावनिक, प्रेमळ आणि रोमांचक असून या गाण्यात आदिशबरोबर गायिका जाई देशमुख हे प्रमुख कलाकार आहेत. जाई देशमुख यांनीच हे गाणं गायलं असून अमेय मुळे यांनी या गाण्याला संगीतबद्ध केलं आहे. तर या गाण्याच गीतरचना सुप्रसिद्ध गीतकार अंबरीष अरुण देशपांडे यांनी केलं आहे. गाण्याचे दिग्दर्शन अमोल तुमणे याने केलं आहे. या गाण्याची निर्मिती सुप्रसिद्ध गायिका जाई देशमुख यांनी केली आहे.

अभिनेता आदिश वैद्य 'कशी ओढ' गाण्याविषयी सांगतो, "मला या गाण्याची विचारणा केली असता मी हे गाण ऐकताच क्षणी होकार दिला. गाण्याच्या चित्रीकरणावेळी सेटवर खूप मज्जा मस्ती केली. गाण्याच्या रिहर्सलला मला वेळच मिळाला नव्हता. परंतु गाण्याच्या चित्रीकरणावेळी मला खूप टेन्शन आल होत. मी आणि जाईने मिळून एकाच टेकमध्ये शूट पूर्ण केले. त्यामुळे गम्मत म्हणजे पॅकअप करून सगळ्यांना वेळेत घरी जाता आल. सोशल मीडियावर गाण्याच्या टीज़र ला आणि गाण्याला प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळताना दिसतोय. त्यासाठी प्रेक्षकांचे मनापासून आभार."

"मी 'पॅनोरमा म्युझिक' प्रस्तुत 'कशी ओढ' गाण्याद्वारे संगीतसृष्टीत पदार्पण करत आहे. या आधी मी भरत जाधव यांच्यासोबत पुन्हा सही रे सही या नाटकात मी मीरा ही भूमिका साकारली आहे. या नाटकाच दिग्दर्शन केदार शिंदे यांनी केल आहे. शिवाय अशोक पत्की यांनी मला तुकाराम चित्रपटात पार्श्वसंगीत गाण्याची संधी दिली. अभिनय, गायन आणि निर्माती म्हणून प्रोडक्शन सांभाळण हे जबाबदारीच काम होत. पण यातून खूप शिकायला मिळाल. पहिलच गाण आणि ते ही 'पॅनोरमा म्युझिक' सारख्या नामांकित रेकॉर्ड लेबलने घेण हे सर्वच माझ्यासाठी स्वप्नवत होत. शाळेतल पहिल निरागस प्रेम या गाण्यातून एस्थेटिकली दाखवण्याचा प्रयत्न आम्ही केलाय आणि मी आशा करते की हे गाण प्रेक्षकांना नक्की आवडेल." असं या गाण्याच्या गायिका, निर्मात्या आणि अभिनेत्री जाई देशमुख यांनी सांगितलं.

## 'नाच गं घुमा'च्या यशानंतर स्वप्नील जोशीची नवी निर्मिती, 'सुशीला -सुजीत' चित्रपटाचा मुहूर्त संपन्न



अभिनेता स्वप्नील जोशीने 'नाच गं घुमा' या सिनेमाच्या माध्यमातू निर्मिती क्षेत्रात पाऊल ठेवलं. त्याचा हा पहिला सिनेमा बॉक्स ऑफिसवरही यशस्वी ठरल्याचं चित्र होतं. त्यानंतर पुन्हा एक नवा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला घेऊन येणार आहे. नुकतच त्याच्या सुशीला सुजीत या सिनेमाचा मुहूर्त संपन्न झाला. या सिनेमाच्या माध्यमातून स्वप्नील प्रेक्षकांसाठी काय नवं घेऊन येणार याची उत्सुकता आहे.

स्वप्नील जोशीसोबत अभिनेता प्रसाद ओक-मंजिरी ओक, संजय मेमाणे आणि निलेश राठी हे कलाकारही या सिनेमाची निर्मिती करणार आहेत. त्यामुळे कलाकारांची एक मोठी फौज या सिनेमाच्या निमित्ताने एकत्रित निर्मितीची धुरा सांभाळणार आहे. मोठे कलाकार हा सिनेमाची निर्मिती करणार असून सिनेमाची स्टारकास्ट कशी असणार हे पाहणं उत्कंठावर्धक ठरणार आहे.

चित्रपटाचा मुहूर्त देखील तितकाच खास ठरला आणि याच कारण देखील तेवढं खास आहे. आघाडीचा अभिनेता लेखक निर्माता जितेंद्र जोशी याने या चित्रपटाच्या मुहूर्तला खास हजेरी लावून चित्रपटाचा मुहूर्त खास केला आहे. जितेंद्र जोशी हा या सगळ्यां निर्मात्याचा लाडका मित्र तर आहे आणि म्हणून लाडक्या जवळच्या मित्राच्या हातून या चित्रपटाचा मुहूर्त संपन्न झाला आहे.

दगडूशेठ गणतीच्या बाप्पाच दर्शन घेऊन या नव्या चित्रपटाचा श्री गणेशा झाला आहे. चित्रपटाची कथा काय असणार , कोण कलाकार यात दिसणार हे अजून तरी गुलदस्त्यात असलं तरी लवकरच या बद्दल गोष्टी समजतील असं कळतंय !

## 'अरुंधती कायमच माझ्यासोबत राहील...' प्रेक्षकांचा निरोप घेताना 'आई'भावूक

स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' ही मालिका आता प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. जवळपास पाच वर्ष या मालिकेने प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. अनेक वेगवेगळे टप्पे पार करत ही मालिका आता शेवटाला आली आहे. दरम्यान मालिकेतील कलाकारांच्या भावनिक प्रतिक्रिया सध्या समोर येत आहेत. अनिरुद्धची भूमिका साकारणारे अभिनेते मिलिंद गवळी यांनी काही दिवसांपूर्वी एक पोस्ट केली होती. त्यानंतर आता आई म्हणजेच अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर हिने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत. स्टार प्रवाह लवकरच निवेदिता सराफ यांची आई बाबा रिटायर होत आहेत, ही मलिका येत्या 2 डिसेंबर पासून सुरु होत आहे. त्यामुळे आई कुठे काय करते ही मालिका प्रेक्षकांचा निरोप घेतय. नुकतच या मालिकेत अरुंधती ही भूमिका साकारणारी अभिनेत्री मधुराणी प्रभुलकर हिने राजश्री मराठीला मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये अरुंधतीच्या प्रवासाविषयी अभिनेत्रीने भावना व्यक्त केल्या आहेत.'आता भावनाविविश व्हायला होतं..' अरुंधतीच्या प्रवसाविषयी बोलताना मधुराणीने म्हटलं की, 'हा खूपच मोठा प्रवास होता.



## 'बिग बॉस'नंतर सूरजमध्ये काय बदल झाला? जान्हवी किल्लेकर म्हणाली



बिग बॉस च्या पर्वात सहभागी झालेल्या स्पर्धकांबद्दल प्रेक्षकांना कायमच उत्सुकता असते. या खेळात अनेकदा काही स्पर्धकांमध्ये शत्रुत्व निर्माण होते; तर काही स्पर्धकांच्या मैत्रीची चर्चा रंगलेली दिसते. बिग बॉसच्या घरात या स्पर्धकांमध्ये जसे नाते असते, ते नाते तसेच कायम राहणार का, याबद्दलदेखील प्रेक्षकांना उत्सुकता असते.

आता 'बिग बॉस मराठी ५'वे पर्व काही दिवसांपूर्वी संपले आहे. मात्र, या पर्वात सहभागी झालेले स्पर्धक या शोनंतरही एकमेकांच्या संपर्कात असल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून पाहायला मिळत आहे. जान्हवी किल्लेकर आणि सूरज चव्हाण हे बिग बॉसच्या घरात वेगवेगळ्या गटांतून खेळत होते. मात्र, शोबाहेर त्यांनी आपले बहीण-भावाचे नाते जपले आहे. काही दिवसांपूर्वीच जान्हवी सूरज चव्हाणच्या घरी गेली होती. त्यानंतर नुकतीच ती भाऊबीजेलादेखील सूरजकडे गेल्याचे सोशल मीडियावर पाहायला मिळाले. आता जान्हवीने एका मुलाखतीत बिग बॉसनंतर सूरजमध्ये कोणता बदल झाला आहे का? यावर वक्तव्य केले आहे.

अभिनेत्री जान्हवी किल्लेकरने नुकतीच 'लोकशाही मराठी फ्रेंडली'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला विचारण्यात आले की, सोशल मीडियावर सध्या तू बारामतीला सूरजला भेटण्यासाठी गेल्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. बिग बॉसच्या घरातील सूरज आणि आताचा सूरज, या दोहोंमध्ये किती बदल झाला आहे? यावर उत्तर देताना जान्हवी किल्लेकरने म्हटले, "मला सूरज आता जास्त प्रेमळ वाटायला लागला आहे. बिग बॉसच्या घरात तो त्याचा गेम असेल किंवा काहीही असेल, ते ठीक आहे. तो गेम तसा फारसा खेळलाच नाही. तो जसा बाहेर होता, तसाच आतमध्ये वागला आहे. पण, आता तिथे त्याच्या गावी गेल्यावर त्याला असं झालेलं की, जान्हवी आली आहे, तिला कुठं ठेवू, तिला छान वाटेल, असं तिच्यासाठी काय करू.

## चारुलताच भुवनेश्वरी! अक्षराची शंका खरी ठरली, 'त्या' गोष्टीमुळे मास्तरीण बाईंनी अचूक ओळखलं



तुला शिकवीन चांगलाच धडा' मालिकेत गेल्या काही दिवसांपासून खरी भुवनेश्वरी नेमकी कोण, ती कुठे आहे याचा शोध सुरू असल्याचा सीक्वेन्स चालू आहे. मालिकेत काही महिन्यांआधी अधिपतीची खरी आई चारुलताची एन्ट्री झाली होती. अक्षराने स्वत:हून तिला घरी आणलं होतं. चारुहास-अक्षराने जरी चारुलताला स्वीकारलं असलं तरीही अधिपती काही केल्या तिला आई म्हणून स्वीकारण्यास तयार नसतो. अधिपती केवळ भुवनेश्वरीलाच आपली आई मानत असतो. त्यामुळे तो चारुलतापासून कायम अंतर राखून वागत असतो. एकीकडे या गोष्टी सुरू असताना दुसरीकडे दुर्गेश्वरीची कारस्थानं सुरूच असतात. मात्र, दुर्गेश्वरीला शिक्षा करण्यापेक्षा तिला माफ करणं चारुलता जास्त योग्य समजते. तिच्या या निर्णयाचा सर्वांनाच धक्का बसतो. अक्षराला सुद्धा चारुलताच्या वागण्याबाबत शंका येते. ती अधिपतीला सांगते, "आईनी मावशींना एवढ्या सहज माफ केलं, मला त्यांच्या माफ करण्यात सहजता जाणवली. आईंना मावशींबरोबर काहीतरी जवळीक जाणवली असणार" हळुहळू घरात वावरणारी व्यक्ती कोण आहे? भुवनेश्वरी की चारुलता... याबद्दल अक्षराच्या मनात संभ्रम निर्माण होऊ लागतो. अशातच तिला बाजारात फिरताना भुवनेश्वरीची झलक दिसते. मात्र, अक्षरा मागे जाताच भुवनेश्वरी डोळ्यासमोरून दिसेनाशी होते.

## गळ्यात मंगळसूत्र, हातात हिरवा चुडा अन्; 'फँड्री'तील जब्या-शालूचा नवा फोटो चर्चेत



'फँड्री' चित्रपटातली जब्या आणि शालूची जोडी गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. चित्रपटात जब्याची भूमिका अभिनेता सोमनाथ अवघडेने तर, शालू हे पात्र अभिनेत्री राजेश्वरी खरातने साकारलं होतं. २०१४ मध्ये हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. मात्र, या दोघांना आजही त्याच नावांनी ओळखलं जातं. सोशल मीडियावर शालू-जब्याचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. हे दोघंही एकत्र व्हिडीओ-फोटो शेअर करत चाहत्यांचं लक्ष वेधून घेत असतात.राजेश्वरी-सोमनाथ यांचं खऱ्या आयुष्यात जमलंय अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून सोशल मीडियावर सुरू होत्या. अशातच साधारण पाच दिवसांपूर्वी राजेश्वरीने लग्नमंडपात हळद लागतानाचा फोटो इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. यामध्ये राजेश्वरी आणि सोमनाथ दोघंही एकमेकांच्या बाजूला डोक्याला मुंडावळया बांधून बसल्याचं पाहायला मिळत आहे. तर, दोन दिवसांआधी अभिनेत्रीने आणखी फोटो शेअर करत सर्वांचं लक्ष वेधून घेतलं होतं.

## दिनविशेष

### घटना

२००१: बेल्जियमची राष्ट्रीय विमान वाहतुक कंपनी सबीना (SABENA) दिवाळखोरीत गेली.
१९९०: मेरी रॉबिन्सन या आयर्लंडच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष बनल्या.
१९५१: एम. पातंजली शास्त्री यांनी भारताचे २ रे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९४४: फ्रँकलिन डी. रूझवेल्ट चौथ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आले.
१८७९ : वासुदेव बळवंत फडके यांना जन्मठेप (काळयापाण्याची) शिक्षा ठोठवण्यात आली.
१८७५: सुजलाम् सुफलाम्, मलयज शीतलाम्, साश्यशामलाम्, मातरम् वंदे...! वंदे मातरम् असे भारतमातेचे वर्णन करणारे गीत बंकिमचंद्र यादावचंद्र चटर्जी यांनी लिहिले.
१६६५: सर्वात जुने जर्नल लंडन गॅझेट पहिल्यांदा प्रकाशित झाले.

### जन्म

१९८१ : अनुष्का शेट्टी भारतीय अभिनेत्री
१९८०: कार्तिक भारतीय गायक - गीतकार
१९७५ : वेंकट प्रभू - भारतीय अभिनेते, दिग्दर्शक आणि पटकथालेखक
१९७१ : त्रिविक्रम श्रीनिवास भारतीय दिग्दर्शक आणि पटकथालेखक
१९६०: श्यामप्रसाद भारतीय चित्रपट निर्माते
१९५४: कमल हासन - भारतीय तामिळ अभिनेते, निर्माते आणि राजकारणी- पद्म भूषण, पद्मश्री, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार
१९२२ : विद्याबेन शाह - भारतीय ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या ( निधन : १९ जून २०२०)
१९१५: गोवर्धन धनराज पारिख महाराष्ट्रातील विचारवंत व शिक्षणतज्ञ

### मृत्यू

२०२२: सर रॉजर भटनागर भारतीय न्यूझीलंडचे उद्योजक, न्यूझीलंडमध्ये नाइट पदवी मिळवणारे पहिले भारतीय वंशाचे व्यक्ती (जन्म: २६ ऑक्टोबर १९४२)
२०१५ : बाप्पादित्य बंदोपाध्याय भारतीय दिग्दर्शक आणि कवी (जन्म: २८ ऑगस्ट १९७०)
२००९: सुनीता देशपांडे - लेखिका व स्वातंत्र्यसैनिक (जन्म: ३ जुलै १९२६)
२००६: पॉली उम्रीगर भारतीय क्रिकेटर आणि मॅनेजर (जन्म: २८ मार्च १९२६)
२०००: सी. सुब्रम्हण्यम - गांधीवादी नेते, केंद्रीय मंत्री व महाराष्ट्राचे राज्यपाल (जन्म: ३० जानेवारी १९१०)
१९९८ : पं. जितेंद्र अभिषेकी शास्त्रीय गायक व संगीताचे अभ्यासक (जन्म: २१ सप्टेंबर १९२९)

## राशी भविष्य

**मेष** - धर्मपरायण व्यक्तीचे शुभाशिर्वाद तुम्हाल मन:शांती मिळवून देतील. जर तुम्ही विवाहित आहेत तर आपल्या मुलांची विशेष काळजी घ्या कारण, जर तुम्ही असे केले नाही तर, त्यांची तब्बेत बिघडू शकते आणि तुम्हाला त्यांच्या स्वास्थ्यावर बराच पैसा खर्च करावा लागू शकतो.

**वृषभ** - प्रदीर्घ आजारातून तुम्ही बरे व्हाल. आज आर्थिक पक्ष चांगले राहील परंतु, यासोबतच तुम्हाला ही काळजी घ्यावी लागेल की, तुम्ही आपल्या धनाला व्यर्थ खर्च करू नका.

**मिथुन** - तुमची ऊर्जा पातळी खूप उच्च असेल. आकर्षक वाटणा-या योजनेत गुंतवणूक करण्यापूर्वी वरवर विचार न करता त्याच्या मूळाशी जा. गुंतवणूक करण्यापूर्वी आणि कोणताही शब्द देण्यापूर्वी तज्ञांशी बोलून घ्या.

**कर्क** - कलात्मक काम तुम्हाला आराम मिळवून देईल. रात्रीच्या वेळी तुम्हाला आज धन लाभ होण्याची पूर्ण शक्यता आहे कारण, तुमच्या द्वारे दिले गेलेले धन आज तुम्हाला परत मिळू शकते.

**सिंह** - आनंदाने खुशीने परिपूर्ण असा चांगला दिवस. आज घरातून बाहेर जातांना मोठ्यांचा आशीर्वाद घेऊन निघा यामुळे तुम्हाला धन लाभ होऊ शकतो.

**कन्या** - आजच्या दिवशी तुम्ही चैतन्याने भारले असलात तरी तुमच्याबरोबर असायला हवी अशा व्यक्तीची कमतरता तुम्हाला नक्कीच जाणवेल. कोणतीही गुंतवणूक घाईगडबडीत करू नका.

**तूळ** - तुमची इच्छाशक्ती जबरदस्त असल्याचे फळ तुम्हाला आज मिळेल आणि त्यामुळे एका अतिशय विचित्र, गुंतागुंतीच्या परिस्थितीशी तुम्ही सामना करू शकाल. भावनिक निर्णय घेताना तुम्ही अस्थिर होऊ नका.

**वृश्चिक** - खेळावर काही रक्कम खर्च करा, कारण निरंतर चिरस्थायी तरुणाईचे ते गुपित आहे. जीवनसाथीच्या आरोग्य संबंधित समस्यांमुळे तुमचे धन खर्च होऊ शकते परंतु, तुम्हाला या विषयी चिंता करण्याची आवश्यकता नाही कारण, धन यासाठीच साठवले जाते की, ते कठीण वेळेत आपल्या कामी येईल.

**धनु** - तुमच्या दयाळू स्वभावामुळे आज अनेक आनंदाचे क्षण अनुभवाल. आजच्या दिवशी समोर येणारे गुंतवणुकींचे नवे पर्याय धुंडाळा, पण प्रकल्पाची व्यावहारिकता सखोलपणे अभ्यासल्यावरच आपला सहभाग जाहीर करा.

**मकर** - तुमची प्रकृती सुधारा आणि चांगले आयुष्य जगण्यासाठी संपूर्ण व्यक्तिमत्व बदलण्याचा प्रयत्न करा. अधिकचा पैसा स्थावर जंगम मालमत्तेत गुंतवा.

**कुंभ** - तुमचे आरोग्य आणि ऊर्जा बचतीची सवय तुम्हाला दीर्घ काळ प्रवासाच्या योजनेसाठी फायदेशीर ठरेल. अतिशय व्यस्त असूनही तुम्ही आरोग्य चांगले राखल्यामुळे थकवा येणार नाही. विचार न करता कुणाला ही आपला पैसा देऊ नका तुम्हाला येणाऱ्या काळात मोठी समस्या येऊ शकते.

**मीन** - ज्येष्ठांनी त्यांच्या जास्तीच्या ऊर्जेचा वापर सकारात्मक गोष्टींसाठी करून त्याचा चांगला लाभ घ्यावा. आपली सांपत्तिक स्थिती सुधारली असली, तरी खर्चाचे प्रमाण वाढतच असल्यामुळे तुमच्या योजना राबविण्यात अडचणी निर्माण करेल. तुमचे व्यक्तिमत्व आणि मोहक आकर्षकता यामुळे काही नवे मित्र जोडाल.

# शिवडी, वरळी बीकेसीत अशुद्ध हवा, मुंबईची हवा गुणवत्ता खालावली



**मुंबई (यश सावंत) :** मुंबईतील हवेचा निर्देशांक बुधवारी सकाळी मध्यम श्रेणीत नोंदला असून शिवडी, वरळी तसेच वांद्रे – कुर्ला संकुल येथे 'वाईट' हवेची नोंद झाली. मुंबईतील हवेची गुणवत्ता मंगळवारीही मध्यम श्रेणीत होती. 'समीर' ॲपनुसार बुधवारी सकाळी मुंबईच्या हवेचा निर्देशांक ११४ वर पोहोचला होता.

मुंबईत सध्या आर्द्रता असल्याने सकाळी प्रदूषके साचून राहतात. समीर ॲपच्या नोंदीनुसार, बुधवारी सकाळी शिवडी येथील हवा निर्देशांक २२६, तर वरळी येथील २२५ इतका होता. तसेच खेरवाडी-वांद्रे २०५, वांद्रे -कुर्ला संकुल हवा निर्देशांक २२५ इतका होता. दरम्यान, मंगळवारी देखील सायंकाळी हवा मध्यम श्रेणीत नोंदली गेली होती.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या निकषांनुसार, हवा गुणवत्ता निर्देशांकातील ०-५० म्हणजे चांगले, ५१-१०० समाधानकारक, १०१-२०० मध्यम, २०१-३०० वाईट, ३०१-४०० अत्यंत वाईट आणि ४०० पेक्षा जास्त म्हणजे अतिधोकादायक समजली जाते. भारतीय हवामान विभागाने मुंबई शहर आणि उपनगरासाठी दैनंदिन अंदाजामध्ये सकाळी धुके पडण्याची शक्यता आणि मुख्यतः निरभ्र आकाश असण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. तसेच, कमाल तापमान ३३ ते ३५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. तर, किमान तापमान २० ते २२ अंश सेल्सिअसच्या आसपास राहण्याची शक्यता आहे. दरम्यान ,पावसाळ्यानंतर मुंबईतील वाऱ्यांची स्थिती बदलते, वेग मंदावतो. त्यामुळे हवेत साचलेली धूळ, प्रदूषके यांचा निचरा होत नाही. बाष्पामुळे धुलीकण हवेतच तरंगत राहतात. या नैसर्गिक कारणांबरोबच अनेक मानवनिर्मित कारणेही मुंबईच्या प्रदूषणात भर घालत आहेत. पायाभूत सुविधा, रहिवासी व व्यावसायिक संकुले, नवे प्रकल्प यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यातून उडणारी धूळ हवेचा दर्जा ढासळण्यास कारणीभूत ठरत असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून नोंदवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वाहनांतून बाहेर पडणाऱ्या धुरांमध्ये अतिसूक्ष्म काजळीसारखे कण असतात. हे कण एकत्र येऊन वातावरणातील प्रदूषण वाढविण्यास कारणीभूत ठरतात.

हवेचा दर्जा ढासाळल्याने काळजी काय घ्यावी ?

प्रदूषणामुळे श्वसन आणि त्वचेशी संबंधित आजार उद्भवतात. सकाळी आणि सायंकाळी धुरक्याचे प्रमाण जास्त असते. अशा वेळी घराबाहेर पडणे टाळावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. थंड पेय, तेलकट पदार्थ वर्ज्य करावे. लहान मुले, वयोवृद्ध यांच्यासाठी हे वातावरण धोकादायक असल्याने त्यांनी विशेष काळजी घ्यावी.

# राज्य उत्पादन शुल्क विभागा मार्फत १,०१,३९,०९० रकमेची दारू जप्त



**पालघर (सतीश सोनावणे) :** महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ करीता आचारसंहिता दि. १५ ऑक्टोबर, २०२४ पासुन लागु झालेली आहे. करीता अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, पालघर या विभागाव्दारे गेल्या २० दिवसात दारुबंदी कायद्यान्वये एकुण ९९ गुन्हयाची नोंद करण्यात आलेली आहेत. त्यामध्ये विदेशी मद्य ९२.२२ ब.लि., बिअर-३२.५ ब.लि., देशी मद्य-६.०३ ब.लि., ताडी-१०३५ ब.लि., परराज्यातील विदेशी मद्य व बिअर एकुण-१८४८.६ ब.लि., हातभट्टी दारु ११९० ब.लि., व रसायण ७१९२० व इतर १८४ असा मुद्येमाल जमा केला असुन त्या मुद्येमालाची एकुण रु. १,०१,३९,०९०/- एवढी आहे.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ आचारसंहिता लागु झाल्यानंतर निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मोठ्या प्रमाणावर होणारी अवैध दारु निर्मिती व वाहतुक या बाबी लक्षात घेता राज्य उत्पादन शुल्क, विभागाचे आयुक्त विजय सुर्यवंशी, , जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवणूक अधिकारी गोविंद बोडके, राज्य उत्पादन शुल्क, विभागाचे संचालक प्रदास सुर्वे, संचालक, प्रदिप पवार, विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक एस.एल. कदम, यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची नेमणूक करुन संपुर्ण पालघर जिल्हयात अवैध मद्य निर्मिती , विक्री व वाहतुक करणाऱ्या इसमावर धडक कारवाई करण्यात येत आहे. सदर कारवाईमध्ये अवैध गावठी दारु निर्मिती विक्री वाहतुकीचे एकूण ६५ गुन्हे नोंद करण्यात आले आहेत. तसेच आचारसंहिता कालावधीमध्ये परराज्यातुन येणाऱ्या अवैध मद्याचे एकुण १७ गुन्हे दाखल असुन त्यामध्ये एकुण १८४८.०६ ब.लि. मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच त्यामध्ये एकुण ८ वाहनासह एकूण रु.५७,१४,५२०/- किंमतीचा मुद्येमाल जप्त करण्यात आलेला आहे.

# वंचितच्या नांदगाव माजी तालुकाध्यक्षांना माघारीसाठी धमकी




**नाशिक (सचिन कदम) :** नांदगाव मतदार संघात वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाध्यक्ष बाळू उर्फ बाळासाहेब बोरकर यांना माघार घेण्यासाठी शिवसेनेचे (एकनाथ शिंदे) नांदगाव तालुकाध्यक्ष साईनाथ गिडगे यांनी धमकी दिल्याप्रकरणी बोरकर यांनी नांदगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या धमकीमुळे बोरकर यांनी माघार घेतली. नांदगाव मतदार संघात बोरकर यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज भरला होता. पण, शिंदे गटाचे नांदगाव तालुकाध्यक्ष साईनाथ गिडगे यांनी धमकी दिल्यामुळे आपणास माघार घ्यावी लागली. गिडगे, आमदार सुहास कांदे यांचे नाव घेऊन वारंवार जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. रविवारी या धमकीमुळे माघार घेतल्याचे बोरकर यांनी म्हटले आहे. आपण वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष होतो. नांदगाव विधानसभेसाठी उमेदवारी न मिळाल्याने राजीनामा देत अपक्ष उमेदवारीसाठी अर्ज दाखल केला होता. परंतु, गिडगे यांच्या धमक्यांमुळे माघार घ्यावी लागली. माघारीनंतर प्रचंड दबाव आहे. आपणास आणि कुटूंबियांना गिडगेपासून धोका आहे. त्यामुळे काही विचित्र घडल्यास, घातपात झाल्यास त्याला साईनाथ गिडगे आणि त्याच्या बरोबरचे साथीदार जबाबदार राहतील.

# चिंचवडमध्ये अनधिकृत बांधकामे, टँकर लॉबी आणि कोंडी...!

**पिंपरी ( सुचिता देशमुख) :** अपुरा पाणीपुरवठा, टँकर लॉबीचे वर्चस्व, वाहतूक नियोजनाचा अभाव, वाढते प्रदूषण, अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे अशा प्रश्नांना सामोरे जाणारा चिंचवड विधानसभा मतदारसंघ यातून सुटकेची वाट पाहतो आहे. हे प्रश्न प्रलंबित असून, वारंवार पाठपुरावा करुनही तोडगा निघत नसल्याने या भागातील नागरिकांमध्ये नाराजी आहे.



राज्यातील सर्वाधिक मतदारसंख्येचा मतदारसंघ अशी चिंचवडची ओळख. पिंपळेगुरव, पिंपळेनिलख, पिंपळेसौदागर, सांगवी, थेरगाव, वाकड, चिंचवड, वाल्हेकरवाडी, किवळे, रावेत, पुनावळे असा परिसर या मतदारसंघात येतो. यापैकी रावेत, वाकड, पुनावळे, किवळे परिसरात गगनचुंबी गृहनिर्माण सोसायट्या उभ्या राहत आहेत. हा भाग झपाट्याने विस्तारत असून, लोकसंख्येत मोठी भर पडत आहे.

वाढत्या लोकसंख्येला पुरेसा पाणीपुरवठा करण्यात महापालिका प्रशासनाला अपयश येत आहे. महापालिका एक दिवसाआडही पुरेसा पाणीपुरवठा करू शकत नाही. त्यामुळे या भागातील पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. गृहनिर्माण संस्थांमधील रहिवाशांना टँकरवर लाखो रुपये खर्च करावा लागतो. टँकर व्यावसायिकांनी पाण्याच्या व्यवसायातून कोट्यवधी रुपये कमावले आहेत. त्यामुळे ही पाणी टंचाई या 'लॉबी'ला पोसण्यासाठी केली जाते का, असा प्रश्न उपस्थित केला जातो. पाण्याची समस्या सोडविण्यासाठी भामा आसखेड धरणातून पाणी आणण्यात येणार आहे. परंतु, त्याचे काम संथ गतीने सुरू आहे. हिंजवडीतील माहिती तंत्रज्ञाननगरीचा रस्ता थेरगावातील डांगे चौकातून जातो. त्यामुळे ये-जा करणाऱ्या नोकरदारांची संख्या मोठी असल्याने सकाळी आणि संध्याकाळी भूमकर चौकात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या असतात. प्रशस्त रस्ते असूनही वाहतूक कोंडीत भर पडते. कारण, पदपथ तसेच रस्त्यांवर अतिक्रमणे झाली असून, त्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. वाहतूक नियोजनाचा अभाव दिसून येत आहे.

मतदारसंघात समतोल विकासाचा मोठा अभाव आहे. पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर, पिंपळेनिलख, रावेत भागाचा प्रचंड विकास झाला. त्या तुलनेत किवळे, थेरगाव, वाल्हेकरवाडी परिसराचा विकास झाला नाही. या भागात अतिक्रमणांचा प्रश्न गंभीर आहे. अनधिकृत बांधकामांचा प्रश्न जैसे थे असून, घरांवरील कारवाईची टांगती तलवार कायम आहे. प्रस्तावित वर्तुळाकार मार्गाला (रिंग रोड) नागरिकांचा विरोध आहे. रावेतवर रेड झोनचे संकट आहे.

चिंचवडमधून वाहणाऱ्या पवना नदीत सांडपाणी थेट सोडले जाते.

**SPORT**

# Arjun Deshwal Touches 4-Digit Landmark In Jaipur Pink Panthers' Hard-Fought Win

A double delight was in store for the Jaipur Pink Panthers as they prevailed over the UP Yoddhas with a tight 33-30 win at the GMCB Indoor Stadium in Hyderabad on Tuesday, as Arjun Deshwal became just the seventh raider to score 1000 Raid Points in the event's history.

Neeraj Narwal's nine points (7 Raid Points) was the highlight of their performance as Jaipur Pink Panthers emerged victorious.

It was a slow start to the game for both teams. Jaipur Pink Panthers' Arjun Deshwal opened the scoring before Gagan Gowda joined the party for the UP Yoddhas. The teams exchanged points regularly throughout the game, although the Jaipur Pink Panthers were ahead of their opponents for most of the first half. Neeraj Narwal complemented his captain Arjun Deshwal well throughout, while Reza



Mirbagheri and Surjeet Singh commanded the defense.

Despite this, it was the UP Yoddhas who took a two-point lead at the end of the second half, with the score reading 15-17. This was due to a successful Super Tackle by Sumit to get Arjun off the mat. Bharat Hooda's four Raid Points and one Tackle Point also aided their efforts, ably supported by Gagan Gowda in the attack and Ashu Singh in the defense.

Super Tackles seemed to be the name of the game for the UP Yoddhas as they first got Neeraj Narwal, and then the dangerous Deshwal. However, the UP Yoddhas were playing on fumes since the start of the second half, allowing the Jaipur Pink Panthers to get the first ALL OUT of the game in the 12th minute. It was Neeraj Narwal, who took charge of the raiding department for the Jaipur Pink Panthers. On the other side, Hitesh completed a High 5, which kept his team in the game. As the match continued to be lop-sided, Arjun Deshwal created his own piece of history as he became the second-fastest raider to 1000 Raid Points, getting Surender Gill with the slightest of touches. A see-saw game to the very end, Reza Mirbagheri finished the match with a High 5. But it was Ankush Rathee's successful defense on Surender Gill that effectively sealed a win by just three points for the Jaipur Pink Panthers.

# Harbhajan Singh says 'Take the Olympic gold back' after report claims boxer Imane Khelif is a 'biological man'



The gender controversy involving Algerian boxer Imane Khelif has erupted once again after a medical report that got leaked said that the Paris Olympics gold medallist is a "biological man". Former India cricketer Harbhajan Singh has strongly responded to the report, opining that the Olympic gold medal that Imane won be taken back.

"The Olympics wanted you to believe this is a WOMAN. Imane Khelif was allowed to beat up women and claim a gold medal. Those that stood up against the injustice were called 'racist.' Now, medical reports reveal Imane Khelif is in fact a MALE," a post on "X" read.

To which, Harbhajan replied saying, "Take the Gold back @Olympics This isn't fair". The leaked medical report, which French journalist Djaffar Ait Aoudia was able to obtain, had said that Imane had "internal testicles and XY chromosomes", and no ovaries or uterus.

Imane Khelif gender controversy | Boxing chief hits out at Olympics Committee as ex-elite athletes ask for her removal

The medical report had been reportedly made in 2023 by experts from Kremlin-Bicetre Hospital in Paris and Mohamed Lamine Debaghine Hospital in Algiers.

# PT Usha confirms dates for the 38th National Games in Uttarakhand

PT Usha, President of the Indian Olympic Association (IOA), has confirmed the dates for the 38th National Games in Uttarakhand.In an official letter to Uttarakhand Chief Minister Pushkar Singh Dhami, she highlighted the event's significance and the IOA's commitment to ensuring its success. Despite the indefinite postponement of the IOA's Special General Meeting, originally set for October 25, 2025, PT Usha assured the Chief Minister that the IOA remains fully committed to the Nati-



onal Games. She emphasised that internal IOA matters would not affect the planning and execution of this key event. The IOA has approved the proposed dates for the National Games, from January 28 to February 14, 2025. However, PT Usha noted a scheduling clash with the Asian Winter Games, which will be held in Harbin, China, from February 7 to February 14, 2025. As India will be sending a large contingent to the Asian Winter Games, she highlighted the need to adjust the National Games schedule to prevent any overlap. To ensure the smooth conduct of the National Games, the IOA has established a Games Technical Conduct Committee (GTCC) and other key committees dedicated to supporting preparations. The commitment of these committees is directed towards delivering an exceptional event in Uttarakhand.

# Virat Kohli Hits New Career Low; For First Time In 10 Years Falls Below..

Virat Kohli hit a new career low in Test cricket after a horror series against New Zealand in which India suffered a historic 3-0 whitewash on home soil.

Kohli's poor returns with the bat were among the main reasons for the Rohit Sharma-led team's struggles, as the former Indian captain made just 93 runs in six innings at an average of 15.50 with one half-century to his name. The horror display has cast doubt over Kohli's future in the team in the longest format of the game, with many debating whether the 36-year-old has already played



his last Test on home soil. All eyes will be on the Indian batting mastero when the Indian team travel to Australia for the blockbuster Border Gavaskar Trophy (BGT).

Kohli's struggles in the longest format was reflected in the latest International Cricket Council (ICC) Test Rankings for Batter's as the 35-year-old found himself in the 22nd spot. This marks the first time since December 2014 that Kohli is not part of the 20 best batters in world cricket in the longest format of the game. After his horror tour of England in 2014, Kohli had slipped to 21st place in August 2014 and stayed in that spot till India played a Test match again. However, there was no looking back for Kohli since the 2014 Adelaide Tet match against Australia in which he scored a century in both innings in what was also his first match as Test captain . After that match, the Indian cricket legend climbed to 16th place in the rankings.While Kohli did fall to 20th place briefly in 2016 and 2023, he has not gone below the mark ever since till today. From November 2016 to August 21, he was always part of the top 5. Kohli fell out of the top 10 in March 2022. He climbed back upto 6th place in January 2024. After the end of the Bangladesh series, Kohli once again was in 6th place in the ranking but the New Zealand series has seen him drop down by 16 spots in only a month. He slipped to 8th place after the first Test and 13th after the second match.

## खासगी मालमत्ता ताब्यात घेण्यावर अंकुश; सर्व भौतिक संसाधने समुदायांच्या मालकीची नसल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

सर्व खासगी मालमत्ता या समुदायाच्या मालकीची भौतिक संसाधने असू शकत नाहीत असे नमूद करत राज्य सरकारे ती ताब्यात घेऊ शकत नाहीत असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिलेल्या निकालात स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या ९ सदस्यीय घटनापीठाने सात विरुद्ध दोन अशा बहुमताने हा निकाल दिला. या निकालामुळे, सार्वजनिक हित साधण्याच्या दृष्टीने खासगी वितरण करण्यासाठी खासगी मालमत्ता ताब्यात घेण्याच्या राज्य सरकारांच्या अधिकारांवर अंकुश येणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखालील घटनापीठाने राज्यघटनेचे अनुच्छेद ३१क आणि ३९(ब) यांच्या आकलनात स्पष्टता प्रदान केली. त्यामध्ये व्यक्तींचे अधिकार विरुद्ध सार्वजनिक हितासाठी साधनसंपत्तीवर नियंत्रण ठेवण्याचा शासनाचा अधिकार याबद्दल महत्त्वाच्या तरतुदींचा समावेश आहे. या निकालाचा महाराष्ट्रातील मालमत्ता आणि साधनसंपत्तीच्या वितरणाशी संबंधित कायद्यांवर लक्षणीय परिणाम होणार आहे. राज्यातील असुरक्षित झालेल्या जुन्या इमारती आणि त्यांचे पुनर्वसन हा महत्त्वाचा मुद्दा आहे. सरन्यायाधीशांसह न्या. हृषिकेश रॉय, न्या. जे बी पारडीवाला, न्या. मनोज मिश्रा, न्या. राजेश बिंदल, न्या. सतीश चंद्र शर्मा, न्या. ऑगस्टीन जॉर्ज मसीह, न्या. बी व्ही नागरत्ना आणि न्या. सुधांशू धुलिया यांचा या घटनापीठात समावेश होता. त्यापैकी न्या. नागरत्ना यांनी निकालाशी अंशत: सहमती दर्शवली आणि न्या. धुलिया यांनी विरोधात निकाल दिला.

# नवीन महाबळेश्वरला केवळ १०० सूचना-हरकती, आराखड्यावर सूचना-हरकती नोंदविण्यासाठी अखेरचे ४ दिवस

● मुंबई, विशाल कारंडे :

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) साताऱ्यात नवीन महाबळेश्वर वसविले जाणार आहे. यासाठी एमएसआरडीसीकडून प्रारूप विकास आराखडा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या विकास आराखड्याला, नवीन महाबळेश्वर वसविण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला नवीन महाबळेश्वरमध्ये समाविष्ट असणाऱ्या गावातील नागरिकांसह पर्यावरणप्रेमींकडून पर्यावरणाच्या मुद्द्यावरून विरोध केला जात आहे. एकीकडे हे चित्र असताना दुसरीकडे, या आराखड्यावर आतापर्यंत केवळ १०० जणांकडूनच सूचना-हरकती सादर झाल्या असून, त्या सादर करण्यासाठी अखेरचे चार दिवस शिल्लक आहेत.

राज्यातीलच नव्हे तर देशातील पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र म्हणून महाबळेश्वरची ओळख आहे. महाबळेश्वरमध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे, महाबळेश्वरवरील ताण वाढत आहे. हा ताण कमी करण्यासाठी महाबळेश्वरनजीक नवीन महाबळेश्वर वसविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून त्याची जबाबदारी एमएसआरडीसीवर टाकण्यात आली आहे. या नियुक्तीनंतर एमएसआरडीसीने ११५३ चौ. किमी क्षेत्रावरील २३५ गावांचा प्रारूप विकास आराखडा तयार करत तो प्रसिद्ध केला. दरम्यान, नवीन महाबळेश्वरला स्थानिकांचा आणि पर्यावरणप्रेमींचा प्रचंड विरोध आहे. या प्रकल्पामुळे २३५ गावांतील पर्यावरणाला धक्का बसणार असल्याचे सांगत प्रकल्पास विरोध केला जात आहे. प्रकल्प रद्द करण्याचीही मागणी होत आहे. तर, शेकडोंच्या संख्येने सूचना-हरकती सादर करण्याचे आवाहनही केले जात होते.



परंतु, प्रकल्पाला एकीकडे मोठ्या प्रमाणात विरोध होत असताना प्रकल्पाच्या आराखड्यावर सूचना-हरकती मात्र म्हणाव्या तशी प्राप्त झालेल्या नाहीत. आतापर्यंत केवळ १०० नागरिक अथवा संस्थांकडून सूचना-हरकती प्राप्त झाल्याची माहिती एमएसआरडीसीतील सूत्रांनी दिली. सूचना-हरकती सादर करण्यासाठी केवळ चार दिवस शिल्लक असून ही मुदत ९ नोव्हेंबर रोजी संपणार आहे. त्यामुळे, या चार दिवसात आता किती सूचना-हरकती सादर होतात हे पाहणे आता महत्त्वाचे असणार आहे.

### आराखड्यात काय?

नवीन महाबळेश्वरमधील २३५ गावांपैकी अनेक गावे आणि पर्यटनस्थळे दुर्गम भागात असल्याने तिथे पोहचण्यासाठी सक्षम अशी वाहतूक व्यवस्था नाही. त्यामुळे प्रारूप विकास आराखड्यात वाहतूक आणि दळणवळणालाही प्राधान्य देण्यात आले आहे. येथील दळणवळण व्यवस्था मजबूत करण्यासाठी येथे ३४ किमीचे नवीन रस्ते बांधले जाणार असून घाटमाथ्यावर ९० किमीची रेल्वे मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे. त्याच वेळी, ७४ किमीचे नेचर ट्रेल, ४८ किमी लांबीचे सायकल ट्रॅक, २६ किमी लांबीचा रोप वे मार्ग आणि एक किमी लांबीची फ्युनिक्युलर रेल्वेही एमएसआरडीसीने प्रस्तावित केली केली आहे. तर स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी येथे उद्योग समृद्धी केंद्र, पर्यटन सुविधा केंद्र, पर्यटन विकास केंद्र विकसित केली जाणार आहे. यासाठी कौशल्य विकास केंद्रही उभारले जाणार आहे.

## निवडणुकीच्या धामधुमीत वीज यंत्रणा विस्कळीत होणार? महावितरणमधील वाहन पुरवठादारांचा आंदोलनाचा इशारा




● नागपूर, नितीन देवळेकर :

पेट्रोल, डिझेलसह सर्वच इंधनाचे दर वाढल्यावरही महावितरण मागील चार वर्षांपासून भाड्याने घेत असलेल्या वाहनांचे दर वाढवत नाही, असा आरोप करीत या पुरवठादारांनी निवडणुकीच्या तोंडावर आंदोलनाचा इशारा दिला आहे. हे आंदोलन झाल्यास राज्यातील वीज यंत्रणा विस्कळीत होण्याचा धोका आहे. राज्यातील मुंबईचा काही भाग वगळता बहुतांश भागात महावितरणकडून वीज पुरवठा केला जातो. महावितरणकडून ग्राहकांना अखंडित वीज पुरवठ्यासाठी अधिकारी- कर्मचाऱ्यांना गस्त घालणे व देखभाल दुरूस्तीसाठी पुरवठादारांकडून भाड्याने वाहने घेत असते. या पुवठादारांच्या माहितीनुसार, राज्यभरातील अधिकाऱ्यांसाठी महावितरण पुरवठादारांकडून टॅक्सी तर वीज यंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीसाठी लागणारे टॉवर लॅडर व इतर वाहने भाड्याने घेत असते.

दरम्यान मागील काही वर्षांपासून सतत वाढते इंधन दर, कामगारांच्या वेतनानुसार या पुरवढादारांच्या वाहन भाड्याच्या दरात महावितरणकडून वेळोवेळी वाढ अपेक्षित आहे. परंतु, २७ फेब्रुवारी २०२० नंतर दरात वाढच झाली नाही. महापारेषणकडून मात्र २०२१ मध्ये भाड्याने घेतलेल्या वाहनाच्या दरात सुधारणा करण्यात आली. त्यामुळे महावितरणच्या तुलनेत महापारेषणमध्ये पुरवठादारांना किमान तोटा होत नाही. वीज यंत्रणेच्या दुरुस्तीसह इतर कामासाठी सध्या अधिकाऱ्यांसाठी सुमारे ७०० टॅक्सी तर ७०० टॉवर लॅडर महावितरणच्या वापरात आहेत. या सगळ्या वाहनांवरील चालक आणि पुरवठादार असे मिळून सुमारे तीन हजार कुटुंबाचा उदरनिर्वाह या वाहनांमुळे चालतो.

### सध्याचे दर किती?

वर्ग एकच्या अधिकाऱ्यासाठी २४ तास भाड्याच्या वाहनससाठी महिन्याला ३५ हजार ७०० रुपये, वर्ग दोनच्या अधिकाऱ्यासाठी २९ हजार ९०० रुपये, टॉवर लॅडरसाठी ३३ हजार ५०० रुपये , असे दर महावितरणकडून ठरवण्यात आले आहेत. दुसरीकडे महापारेषणमध्ये मात्र वर्ग एकच्या अधिकाऱ्यासाठी महिन्याला ६० हजार रुपये तर वर्ग दोनच्या अधिकाऱ्यासाठी ५० हजार रुपये भाडे दिले जाते.

महावितरणला वारंवार दर वाढवण्याची विनंती केल्यावरही दर वाढत नाही. आताही दर न वाढवल्यास नाईलाजाने आम्हाला आंदोलन करावे लागेल.
– योगेश गोमासे, सचिव, नवचेतना टॅक्सी चालक-मालक संघटना, नागपूर.

## एसटीच्या पुणे विभागाला मिळणार १५० नव्या कोऱ्या बस

● पुणे, सुचिता देशमुख :

एसटीच्या पुणे विभागाच्या ताफ्यात आगामी दोन महिन्यांच्या काळात १५० नव्या इंधनावरील स्वमालकीच्या बस दाखल होणार आहेत. या बसमुळे प्रवाशांचे वेटिंग, गर्दीतून होणारा कसरतीचा प्रवास टळणार असून, त्यांना दिलासा मिळणार आहे. एकेकाळी डबघाईला आलेल्या लाल परीने आता कात टाकायला सुरुवात केली आहे. विविध प्रकारच्या नव्या अत्याधुनिक यंत्रणा असलेल्या गाड्या महामंडळाच्या ताफ्यात दाखल होत आहेत. त्यामुळे एसटी प्रवासाकडे प्रवाशांचे पुन्हा आकर्षण वाढले आहे. पूर्वी लांब पल्ल्याचा प्रवास म्हटला की, प्रवासी एसटीच्या लालपरीला पसंती देत.



## महानगरपालिका निवडणुकीतही 'कोल्हापूर उत्तर'च्या राजकारणाचे होणार परिणाम

● कोल्हापूर, प्रथमेश चव्हाण :

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघातील काँग्रेसची उमेदवारी देण्यावरून झालेल्या पक्षांतर्गत संघर्षाचा परिणाम महापालिका राजकारणावर होणार आहे. आगामी महापालिका निवडणुकीत माजी आ. मालोजीराजे, आ. सतेज पाटील यांना साथ देणार की, सवता सुभा मांडणार, असा सवाल उपस्थित होत आहे. महापालिका राजकारणात १० वर्षे सतेज पाटील यांच्यासोबत असणाऱ्या हसन मुश्रीफ यांची भूमिका बदलत्या राजकारणात महायुतीसोबत आहे. त्यांची साथ सतेज पाटील यांना मिळणार नाही. त्यामुळे लोकसभा निवडणुकीतील शाहू महाराज यांच्या विजयानंतर महापालिका राजकारणात मालोजीराजे पुन्हा सक्रिय होऊन ते सतेज पाटील यांना साथ देतील,

## कोटयधीश नेतेमंडळींचा शेती हाच व्यवसाय!



● छत्रपती संभाजीनगर , दिगंबर जाधव :

शेतमालाचे घसरलेले दर, दुष्काळ, गारपीट यामुळे मराठवाडा व अमरावती विभागात गेल्या २४ वर्षांत तब्बल ३० हजार ७२७ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. असे असताना अनेक उमेदवारांनी आपल्या शपथपत्रांमध्ये उत्पन्नाचा मुख्य स्रोत शेती असल्याचे नमूद करून संपत्तीची आकडेवारी मात्र कोटींच्या घरात नोंदविली आहे.

मराठवाड्यातील ४६ मतदारसंघांमध्ये प्रमुख उमेदवारांनी आपला मुख्य व्यवसाय शेती असल्याचे उमेदवारी अर्ज भरताना दिलेल्या शपथपत्रांमध्ये म्हटले आहे. कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी उत्पन्न स्रोत शेती असल्याचे नमूद केले आहे. त्यांचा २०२३-२४ मध्ये आयकर विभागाकडे ६९ लाख ८८ हजार ७८० रुपयांचे उत्पन्न दर्शविले आहे. माजी कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी शेती, व्यापार, आमदारांचे मानधन, भाडे या उत्पन्नातून मिळविलेल्या संपत्तीचे बाजारमूल्य, त्यांची संपत्ती सहा कोटी ८५ लाख २७ हजार ६०१ रुपयांची असल्याचे नमूद केले आहे. अनेक कंपन्यांमध्ये भागीदारी आणि समभाग असणारे काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांनीही आपला उत्पन्नस्रोत शेती असल्याचे लिहिले आहे. राजेश टोपे, राणा जगजितसिंह पाटील यांचे उत्पन्नही शेतीतूनच आहे. खासदार संदीपान भुमरे यांचे चिरंजीव विलास भुमरे यांनी मद्यविक्रीचा व्यवसाय असल्याचे नमूद केलेले असून संजय शिरसाट यांनी आपण 'विकासक' असल्याचे लिहिले आहे. शेती जर फायद्याची असती तर एवढ्या आत्महत्या झाल्या असत्या का? करमुक्त उत्पन्न दाखविण्यासाठी बाजार समितीमधून पावत्या मिळवून फसवाफसवी केली जात असल्याचा आरोप या विषयाचे अभ्यासक शहाजी नरवडे यांनी केला आहे.

### शेतकरी आत्महत्यांचा आलेख

**मराठवाडा**

- २००१ ते २०२४ या काळात ११,५१८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या
- ८४० शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक लाखाची मदत
- यंदा सप्टेंबरपर्यंत ६६८ शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**अमरावती विभाग**

- २००१ ते २०२४ या काळात २०,७७२ शेतकरी आत्महत्या केल्या.
- यंदा जानेवारी ते ऑगस्टदरम्यान ६९८ आत्महत्या

# विद्यापीठ प्राधान्यक्रम कधी ठरवणार?

● पुणे, अभिजीत येरल्लू :

देशातील महत्त्वाच्या विद्यापीठांमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नाव घेतले जाते. विद्यापीठाने नुकताच अमृतमहोत्सव साजरा केला. या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्ताने विद्यापीठ प्रशासनाने एक हजारांहून अधिक शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चांदीचे नाणे भेट देण्यासाठी लाखो रुपये खर्च केले. विद्यापीठाने नाण्यांवर केलेला खर्च हा मुद्दा नसून, आजूबाजूची परिस्थिती झपाट्याने बदलत असताना, त्यानुसार विद्यापीठ प्राधान्यक्रम कधी ठरवणार आहे, हा खरा प्रश्न आहे. प्राधान्यक्रम निश्चित करून त्यावर खर्च करणे, विद्यार्थी, संशोधन, नावीन्यपूर्ण उपक्रम अशा घटकांवर खर्च करण्याची गरज आहे. मात्र, त्याऐवजी नाण्यांवर होणारा खर्च खटकणारा आहे. विद्यापीठाच्या अधिसभेतील चर्चांमध्ये नेहमीच विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून कामकाज केले पाहिजे, अशी भूमिका मांडली जाते. प्रत्यक्षात खरोखरच तसे ते होते का, हा विचार करण्याचा मुद्दा आहे. गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक साहाय्य होण्यासाठी विद्यापीठाकडून 'कमवा व शिका' योजना राबवली जाते. त्यासाठी विद्यार्थ्यांकडून काही ना काही काम करवून घेऊन त्यांना ४५ रुपये दराने रक्कम दिली जाते. पूर्वी विद्यार्थ्यांना महिनाभर काम दिले जात होते. आता विद्यापीठाने धोरणात बदल करून हा कालावधी जेमतेम २१ दिवसांवर आणला आहे. स्वाभाविकपणे विद्यार्थ्यांच्या हाती कमी रक्कम पडते. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांमध्ये पाण्यासारख्या मूलभूत सुविधा व्यवस्थितपणे उपलब्ध होत नाहीत. विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या जल्लोष, आविष्कारसारख्या स्पर्धा विद्यापीठाकडून अक्षरश: सोपस्कार म्हणून उरकल्या जातात. अशा स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे राष्ट्रीय स्तरावर स्थान कुठे आहे, हे तपासून पाहण्याची गरज आहे.




मुळात विद्यापीठाकडून सादर केला जाणारा अर्थसंकल्प तुटीचा असतो. त्या शिवाय पूर्वी विद्यापीठाकडे ठेवींची रक्कम बरीच मोठी होती. मात्र, गेल्या काही वर्षांत ती कमी होत आहे. स्वायत्ततेच्या धोरणामुळे विद्यापीठाला मिळणारे संलग्नता शुल्क, परीक्षा शुल्क लक्षणीयरीत्या कमी होऊ लागले आहे. पूर्वीच्या अर्थसंकल्पांमध्ये जाहीर केलेल्या कित्येक योजना मार्गी लागलेल्या नाहीत. विद्यापीठाकडून संशोधनासाठी जितक्या प्रमाणात निधी दिला गेला पाहिजे, तितका दिला जात नाही, हे वास्तव आहे. संशोधन हा क्रमवारीतील स्थान उंचावण्यासाठी महत्त्वाचा घटक असताना विद्यापीठाकडून त्यावर काम न होणे गंभीर आहे. पुणे आणि परिसरात अनेक नवी खासगी विद्यापीठे निर्माण झाली आहेत. त्यामुळे विद्यापीठाला आता या विद्यापीठांशी स्पर्धा करावी लागत आहे. विद्यापीठात शिक्षणासाठी राज्याच्या, देशाच्या कानाकोपऱ्यातून, काही देशांतून विद्यार्थी येत असले, तरी हा टक्का आता कमी होत आहे. त्यामुळेच विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांच्या जागा रिक्त राहत आहेत. क्षमतेइतके विद्यार्थी मिळवणे हे सर्वच विद्यापीठांसाठी आव्हानात्मक आहे. त्यासाठी समाजमाध्यमाचा वापर करण्याची गरज आहे. विद्यापीठाचे स मा ज मा ध्य मा म ध्ये काहीही अस्तित्व नाही. अनेक अधिसभांमध्ये या मुद्द्यावर चर्चा करूनही विद्यापीठ प्रशासनाने त्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. देशाचे राष्ट्रपती, पंतप्रधानांसारख्या व्यक्तीही आता समाजमाध्यमाचा प्रभावी वापर केला जात असताना विद्यापीठाची ही समाजमाध्यमातील अलिप्तता खटकणारी आणि नुकसानकारक आहे हे समजून घेण्याची आता वेळ आली आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत विद्यापीठाचे नाव पोहोचण्यासाठी, अभ्यासक्रमांची माहिती त्यांना कळण्यासाठी समाजमाध्यमाचा वापर अपरिहार्य आहे. मात्र, आजवर त्याकडे विद्यापीठाने दुर्लक्षच केले आहे. विद्यापीठाचा अर्थसंकल्प पाहिल्यास त्यात काही गोष्टी निश्चितपणे खटकणाऱ्या आहेत. काही बाबींवर केला जाणारा खर्च अवाजवी आहे. त्यामुळे विद्यापीठाने आधी प्राधान्यक्रम निश्चित करून त्यानुसार अर्थसंकल्पाचा नव्याने विचार करण्याची वेळ आली आहे. सोन्या-चांदीची नाणी हा तात्पुरता मुद्दा झाला, पण आता दीर्घकालीन विचार करावा लागणार आहे. विद्यापीठाने प्राधान्यक्रम न ठरवल्यास आजूबाजूच्या स्पर्धेत प्राधान्यक्रमावरील विद्यापीठ बाजूला जाण्याचा धोका वाढताना दिसत आहे.

## विधानसभा मतदानासाठी सुट्टी बंधनकारक, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर होणार कारवाई

● मुंबई, विशाल कारंडे :



विधानसभा निवडणूक २०२४ साठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. बृहन्मुंबई क्षेत्रातील (मुंबई उपनगर जिल्हा आणि मुंबई शहर जिल्हा) सर्व व्यवसाय, व्यापार, उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आणि इतर आस्थापनांमध्ये कार्यरत असलेले कामगार, कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी देणे बंधनकारक राहील. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ मध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी सुटी देणे संबंधित नियोक्त्यांसाठी बंधनकारक राहील. या नियमांचे पालन न करणाऱ्या नियोक्त्यांविरोधात कारवाई केली जाईल, असे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले आहेत. जिल्हा निवडणूक अधिकारी तथा बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिलेले निर्देश :

- निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रातील कोणतेही व्यवसाय, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा अन्य कोणत्याही आस्थापनांमध्ये कार्यरत असलेल्या आणि राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मतदानाच्या दिवशी म्हणजेच बुधवार, 20 नोव्हेंबर 2024 रोजी सुटी द्यावी.
- सर्व उद्योग समूह, महामंडळ, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना आदींना हा नियम लागू राहील.
- या सुटीच्या बदल्यात संबंधित व्यक्तीच्या वेतनात कोणत्याही प्रकारची कपात करता येणार नाही. या नियमांचे किंवा तरतुदींचे कोणत्याही नियोक्त्याने उल्लंघन केल्यास त्यांच्यावर निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार कारवाई केली जाईल.